म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. नं. 353

# हिंदुस्थानचा राज्यकारभार

लेखक

ना. के. बेहेरे.

सा० १५०२४ इ. ३३६

आ. क्र. ३३६
१३-२-२८

स्था. क्र. ३००८

२२२८

# हिंदुस्थानचा राज्यकारभार

नारायण केशव बेहेरे

किंमत बारा आणे

प्रकाशक—श्रीयुत ना. रा. पंढरपूरकर, बी. ए., एल्‌एल्. बी.,
लोकसेवा प्रेस, वाकर रोड, नागपूर.

मुद्रक—श्रीयुत दामोदर रघुनाथ मित्र, मनोरंजन प्रेस, मुंबई नं. ४.

# दोन शब्द.

हिंदुस्थानचा राज्यकारभार हा विषय दुय्यम शाळांत अवश्य ह्मणून ठेवला आहे. त्याचप्रमाणें नार्मल स्कूलमध्येंहि हा विषय शिकविला जातो. या सर्व विद्यार्थ्यांच्या सोयीकरितां प्रस्तुत पुस्तक लिहिलें आहे. आजपर्यंत या विषयावर जीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं तीं सर्व **"आधीं कळस मग पाया रे"** या नमुन्याचीं आहेत. त्याच्या अगदीं उलट या पुस्तकाची रचना केली आहे. सर्वांना परिचित असलेल्या ग्राम-व्यवस्थेपासून आरंभ करून स्टेट सेक्रेटरीपाशीं या पुस्तकाचा शेवट केला आहे. शिक्षणाच्या दृष्टीनें ही योजना अधिक शास्त्रीय आहे.

२. या पुस्तकांत हल्लीं चालू असलेल्या राज्यपद्धतीची विशेष माहिती दिली आहे, व ऐतिहासिक विवेचन शक्य तोंवर टाळलें आहे. मध्यप्रांत–वऱ्हाडविषयीं सविस्तर माहिती दिली असून, इतर प्रांतां-विषयीं त्रोटक माहिती दिली आहे. याचें कारण प्रस्तुत पुस्तक या प्रांताकरितांच लिहिलें गेलें आहे. विद्यार्थ्यांप्रमाणें सामान्य वाचकांनाहि हें उपयोगी पडेल अशी आशा आहे. कारण मतदारांना ह्यापासून निरनिराळ्या निवडणुकींची–म्युनिसिपालिटी किंवा बोर्डापासून तों कौन्सिल ऑफ् स्टेटपर्यंतची–माहिती मिळेल.

३. उपोद्घात व परिशिष्टें यांचा उपयोग केव्हां करावयाचा हें शिक्षकांनींच ठरविणें बरें. परंतु केव्हांतरी त्या माहितीचा उपयोग केल्याशिवाय राहूं नये, अशी त्यांना विनंती आहे. कारण त्याशिवाय हिंदुस्थानच्या चालू राज्यकारभाराची संपूर्ण कल्पना येणार नाहीं.

वर्धा,<br>
ता. १–५–१९२४. }

**लेखक.**

# उपोद्धात.

समाजांत व्यवस्था राहण्याकरितां एखादी राज्यपद्धति जरूर आहे. कारण एरवीं अंदाधुंदी माजेल, आणि **"बळी तो कान पिळी"** या न्यायानें गरीब व दुबळ्या लोकांना श्रीमंत व सशक्त लोक लुबाडतील, जीवित व द्रव्य यांचें संरक्षण होणार नाहीं, व सर्वत्र बेबंदशाही माजेल. कोणताहि समाज किंवा देश रानटी स्थितींतून सुधारला म्हणजे तो लोकांच्या कल्याणासाठीं एखादी राज्यपद्धति अमलांत आणतो. रानटी लोकांत आणि पशूंत "बळी तो कान पिळी" हाच न्याय चालतो.

एखाद्या माणसाला मुख्य नेमून त्याच्या हुकुमाप्रमाणें बाकीचे लोक चालूं लागतात. याच्या हुकुमांना **कायदा व सुव्यवस्था** असें नांव मिळतें. या मुख्याला **राजा** असें नांव दिलें जातें. हा चांगला असला तर लोकांची व्यवस्था चांगली राहते, पण हा वाईट असला तर लोकांवर जुलूम होऊन त्यांनां छळ सोसावा लागतो. म्हणजे **सुराज्य** ( चांगलें राज्य ) किंवा **कुराज्य** ( वाईट राज्य ) राहणें एका माणसावर अवलंबून असतें. म्हणून हिला **एकतंत्री** राज्यपद्धति म्हणतात. एकतंत्री राज्यांत सुख मिळूं शकतें, परंतु तें सुख नेहमीं टिकेलच अशी खात्री देतां येत नाहीं. कारण चांगला राजा जाऊन वाईट राजा गादीवर बसला तर सर्व स्थिति पालटते.

म्हणून **लोकांना जबाबदार असणारी राज्यपद्धति** ( स्वराज्य ) सर्व पसंत करतात. यूरोपखंडांत व इतरहि सर्व सुधारलेल्या देशांत अशीच राज्यपद्धति अमलांत आहे. लोकांना रुचेल अशाच रीतीनें तेथें राज्यकारभार चालतो. हिंदुस्तानांतहि जबाबदार राज्यपद्धतीचा

प्रारंभ १९१९ सालापासून झाला आहे. पूर्ण जबाबदारीचें स्वराज्य पुढेंमागें पदरांत पडेल. कारण बादशाही घोषणा त्याप्रमाणें झाली आहे.

राज्यकारभार करणारांचीं खालील मुख्य कर्तव्यें आहेत, व तीं कर्तव्यें करणारासच **सरकार** हें नांव शोभेल.

**१. जीवित व मालमत्ता यांचें संरक्षण.** [ मुख्यतः हें काम पोलीसमार्फत होतें. ]

**२. न्याय देणें.** दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही खटल्यांचा योग्य न्याय केल्याशिवाय व्यक्तीचें व समाजाचें संरक्षण होऊं शकत नाहीं स्वतःचा अपराध नसतां एखाद्याचें नुकसान झालें तर त्याची भरपाई करण्याची जबाबदारी नैतिक दृष्टीनें सरकारावर आहे कांहीं गुन्हे एखाद्यादुसऱ्या व्यक्तीच्या विरुद्ध करण्यांत येतात, तर कांहीं समाजव्यवस्थेविरुद्ध असतात. गुन्हेगारांना शिक्षा देऊन त्यांच्यावर वचक बसविला नाहीं तर बेबंदशाही माजेल. [ न्यायखातें हें काम बजावतें. ]

**३. परकीय स्वाऱ्यांपासून देशाचें संरक्षण करणें.** [ लष्कर व आरमार यासाठींच असतात. ]

या तीन गोष्टी करणें हें सरकारचें आद्य कर्तव्यच आहे. हीं कर्तव्यें बजावलीं नाहींत तर तें सरकार एक क्षणभर देखील टिकणार नाहीं. परंतु या गोष्टी फक्त केल्या ह्मणजे तें **सुराज्य** ठरत नाहीं. कोणतेंहि राज्य सुराज्य ठरण्याकरितां खालील जादा कर्तव्यें सरकारास बजावावीं लागतात.

**१. शिक्षणप्रसार**—हा सार्वत्रिक होणें जरूर आहे. त्याकरितां योग्य त्या तजविजी योजणें, उच्च शिक्षण व संशोधन, ग्रंथसंपत्ति

निर्माण करणें, ग्रंथालयें, वर्तमानपत्रें व मासिकें यांना उत्तेजन देणें हें सर्व सरकारच्या कर्तव्यांत मोडतें. [ शिक्षण-खातें. ]

२. **दळणवळण वाढविणें**—रेलवे बांधणें; सडका व पूल तयार करणें; जहाजें, विमानें वगैरे आधुनिक शास्त्रीय शोधांचा वाहतुकीकरितां उपयोग करणें; तारायंत्र, वायरलेस, व टेलिफोन यांचा प्रसार करणें, पोस्टाची उत्तम व्यवस्था ठेवणें—हें सरकारचें काम आहे. [ पोस्ट, तार व रेलवे खातीं. ]

३. **आरोग्य**—दवाखाने स्थापन करणें; सांथीच्या रोगांचा नायनाट करणें; गरीब लोकांकरितां नमुनेदार घरें बांधून देणें; त्यांना शुद्ध व मुबलक पाणी मिळेल अशी व्यवस्था करणें; लोकांचें आयुष्य व आरोग्य वाढविण्याची खटपट करणें; बालमृत्यूंची संख्या कमी करणें, व त्याकरितां त्यांना पोटभर दूध देण्याची व्यवस्था करणें—हें सरकारचें कर्तव्य आहे. [ आरोग्य-खातें. ]

४. **शेती, कला, उद्योगधंदे आणि व्यापार** यांची देशांत वाढ करणें. शेतीच्या सुधारणेशिवाय लोकांना पोटभर अन्न मिळणें कठिण जातें. उद्योगधंदे व व्यापार वाढल्याशिवाय देशाची श्रीमंती वाढूं शकत नाहीं, आणि कलांची भरभराट झाल्याशिवाय कोणत्याहि देशाची कीर्ति दुसऱ्या देशांत गर्जत नाहीं. [ शेती खातें. ]

या चार गोष्टी उत्तम रीतीनें ज्या राज्यांत चालतात त्यालाच सुराज्य ह्मणतात.

सरकारच्या कर्तव्याबरोबरच प्रजेलाहि कांहीं गोष्टी कर्तव्य ह्मणून करणें भाग आहे. राजा आणि प्रजा यांच्या सहकारितेशिवाय राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालूं शकत नाहीं. **प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य**—

१. **आपल्या शेजाऱ्याच्या जिवाला, मालमत्तेला किंवा अब्रूला** आपल्या वर्तनानें किंवा भाषणानें **धोका येणार नाहीं अशी खबरदारी घेणें.** आपण दुसऱ्याशीं चांगले वागलों नाहीं तर दुसऱ्यांनीं तरी आपणांशीं चांगलें वागावें, अशी आशा कशी करतां येईल ? तेव्हां कायद्याचा मान आपण स्वतः राखिला पाहिजे.

२. **स्वतःच्या व कुटुंबाच्या संरक्षण–पोषणासाठीं श्रम करणें.** नाहींपेक्षां भिकाऱ्यांचा देशांत सुळसुळाट होतो व समाजावर त्यांच्या पालनपोषणाचें ओझें पडतें. आपल्याला रुचेल व येईल तो धंदा करावा. लोकांनीं भिकेंत घातलेले लाडू खाण्यापेक्षां, आपल्या श्रमांनीं मिळविलेली भाकरी खाण्यांत अधिक मोठेपणा आहे.

३. **देशाचें संरक्षण व इतर महत्त्वाच्या बाबींत सरकारला मदत करणें.** जर कुठें दरवडा पडला तर दरवडेखोरांना पकडणें हें पोलीसाप्रमाणें आपलेंहि कर्तव्य आहे असें समजलें पाहिजे. सरकार लोकांच्या कल्याणाच्या संस्था उघडील, परंतु त्या संस्थांचा योग्य रीतीनें फायदा करून घेणें हें आपल्या हातीं आहे. आपला फायदा झाला ह्मणजे देशाचा अनायासेंच फायदा होतो. सरकारला वेळच्या वेळीं योग्य कर दिले पाहिजेत. कारण पैसा वेळेवर आला नाहीं तर सरकारला आपलें कर्तव्य कसें करतां येईल ?

४. **राज्यकारभारांत मन घालणें.** आपल्याला मतदानाचे किंवा जे इतर अधिकार मिळाले आहेत, त्यांचा योग्य तारतम्य बुद्धीनें उपयोग करणें जरूर आहे. कोणाच्या भीडमुर्वतीनें आपण मत दिलें व त्यामुळें राज्यकारभार बिघडला तर तो दोष आपल्याकडेच येईल. लोकांचें हित पाहतील अशांनाच पाठिंबा दिला पाहिजे.

१

# खेडें.

तुमच्यापैकीं बरेचसे जण खेड्यांतच राहतात. हिंदुस्थानांतील एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा ८० लोक खेड्यांतच राहतात, व शेती करून आपलें पोट भरतात. शेंकडा वीस लोक काय ते मोठ्या शहरांत राहतात. त्यांच्यापैकीं कोणी व्यापार करतात, कोणी नोकरी करतात व कोणी गिरणी किंवा दुसऱ्या एखाद्या कारखान्यांत मोल-मजूरी करतात, व आपला उदर–निर्वाह करतात. या कारणामुळें हिंदुस्थानांत खेड्याचें महत्त्व फार आहे. खेड्याची व्यवस्था व खेड्याचा कारभार सुधारला तर देशांतील शेंकडा ८० लोक सुखांत राहतील.

खेड्यांतील अधिकारी ह्मटले ह्मणजे एक **पाटील** व दुसरा **पट-वारी** किंवा कुळकर्णी. पाटलाला **मुकादम**हि ह्मणतात. तो बहुधा वंशपरंपरेनें आपला अधिकार चालवितो. खेड्यांतील जमीनमहसूल (शेतसारा) वसूल करणें व तो सरकारी खजिन्यांत पटविणें, खेड्यांत शांतता ठेवणें, गुन्हा घडल्यास त्याची नोंद करून पोलीस ठाण्यावर खबर देणें, हीं त्याचीं मुख्य कामें होत. खेड्यांतील जन्म–मृत्यूची नोंद तो ठेवीत असतो. त्याचप्रमाणें कोणी अधिकारी सरकारी कामा-करितां तेथें आले तर त्यांची व्यवस्थाहि त्याला ठेवावी लागते. पाटलाच्या हाताखालीं **कोतवाल** किंवा **जागल्या** असतो. हा बहुधा महार असतो. पाटलाच्या हुकुमांची याला तामिली करावी लागते. त्याबद्दल त्याला थोडेंसें वेतन मिळतें. त्याशिवाय गांवांतील जनावरें मेलीं तर त्यांच्या कातड्यावरहि त्याचा हक्क असतो. याप्रमाणें पगाराशिवाय थोडासा दुसरा मोबदलाहि त्याला मिळतो.

**कुळकर्णी** किंवा **पटवारी** हे देखील पूर्वी वंशपरंपरेनें चालत असत. पण हल्लीं त्यांचें वतन काढून त्यांच्या जागीं पांचसहा खेडीं मिळून एकेक पगारी पटवारी नेमण्यांत आला आहे. जमिनीचे व शेताचे हे नकाशे ठेवतात, आणि त्या त्या शेतांच्या मालकीची नोंद यांच्या वह्यांत असते. एखाद्या शेताची मालकी बदलली ह्मणजे हे आपल्या वहींत तशी नोंद करतात. त्याचप्रमाणें खेड्यांतील उत्पन्नाची, व जमिनीच्या वर्गवारीची नोंद यांच्या दफ्तरीं असते.

**ग्राम-पंचायती**—पूर्वी खेड्यांतील भानगडी लोकांनीं निवडलेल्या पंचांमार्फत तोडल्या जात असत. मध्यंतरीं या नामशेष झाल्या होत्या. तरी देखील जातीजातींतील भांडणतंटे व इतर धार्मिक गोष्टी जातीच्या पंचांकडूनच आजला देखील निकालांत काढल्या जातात. एखाद्या माणसानें कांहीं अन्याय केल्यास त्याच्यावर हे पंच बहिष्कार टाकून त्याच्यापासून दंड वसूल करतात. लहान लहान गोष्टींचा तेथल्या तेथें निकाल झाल्यामुळें कोर्टांतील भांडणें व कायदेबाजी पूर्वी फार कमी प्रमाणांत असे. पण ती व्यवस्था नाहींशी झाल्यामुळें लोकांना कोर्टांत जाऊन मुकद्दमे लढण्याची चटक लागली. मुकद्दमे लढण्याकरितां शहरांत जावें लागतें, त्यामुळें शेतीकडे दुर्लक्ष्य होऊन वेळ व पैसा यांची खरावी होते. सरकारनें हल्लीं ग्राम-पंचायती पुनः स्थापन करण्याचें ठरविलें आहे, व त्याप्रमाणें कायदा देखील पास झाला आहे. पांचशेंपेक्षां अधिक लोकसंख्या असलेल्या गांवीं या पंचायती स्थापन होतील. खेड्यांतील वयांत आलेले लोक हे पंच निवडून देतील. शेतांच्या हद्दीसंबंधीं व इतर चिल्लर दिवाणी दावे, त्याचप्रमाणें साध्या मारामारीचे फौजदारी

खटले चालविण्याचा हक्क या नव्या पंचायतीला राहील. पंचायतीच्या निकालावर फक्त जिल्हेसाहेबांकडे अपीलअर्ज करतां येईल. ही पंचायत गांवाचें आरोग्य व साफसफाई यांकडे देखील लक्ष्य देईल, व वाटल्यास खर्चासाठीं गांवांतील लोकांकडून थोडासा कर वसूल करील. पंचायतींची स्थापना आपापल्या खेड्यांत करण्याविषयीं गांवकऱ्यांनीं जोराची खटपट केली पाहिजे. नाहींतर कायदा पास होऊनहि कांहीं उपयोग होणार नाहीं.

**शाळा, कांजीहौस ( कोंडवाडे ), पोस्ट आफिस**—बहुतेक मोठ्या खेड्यांत या तीन सार्वजनिक संस्था असतात.

खेड्यांतील शाळांचे दोन प्रकार असतात. प्राथमिक शाळा:—यांत पहिले चार वर्ग असतात व मुख्यत: लिहिणें, वाचणें, गणित व भूगोल या विषयांचें शिक्षण येथें दिलें जातें.

**मध्यम ( मिडल ) स्कूल**—यांत प्राथमिक चार व वरचे तीन असे सात वर्ग असतात. वरच्या तीन वर्गांतील अभ्यासक्रम सुधारलेला असतो, व इतिहास, भूमिति, बीजगणित, ड्रॉइंग वगैरे विषय तेथें शिकविले जातात. **हेड मास्तर** हा शाळेचा मुख्य अधिकारी असतो. गांवांतील लोकांची एक शाळाकमिटी नेमलेली असते. त्या कमिटीच्या सल्ल्यानें हेडमास्तराला वागावें लागतें.

**कांजीहौस**—मोकाट गुरें दुसऱ्याच्या घरांत किंवा शेतांत शिरून मालाची नासाडी करतात, त्यांना कांजीहौसांत आणून कोंडून ठेवतात. ज्याचीं ढोरें असतील त्यानें दंड भरल्याशिवाय गुरांची सुटका होत नाहीं. या भीतीमुळें जनावरांचे मालक आपलीं गुरें फारशीं मोकाट सोडीत नाहींत. कांजीहौसचें काम बहुतेक

(library stamp, handwritten entries)

एखाद्या शाळामास्तराकडे असतें व त्याला त्याबद्दल भत्ता मिळतो. तो कांजीचे सर्व हिशोब ठेवतो. त्याच्या हाताखालच्या माणसाला **चरब्बा** असें ह्मणतात.

**पोस्ट ऑफीस**—येथें कार्ड, लिफाफे विकत मिळतात, व दूर गांवाला पैसे किंवा इतर वस्तु पाठवितां येतात. दुसऱ्या गांवाहून आलेल्या पत्रांचा येथूनच बटवडा होतो, व लोकांनीं लिहिलेलीं पत्रें येथूनच रवाना होतात. पोस्ट ऑफिसची व्यवस्था एखाद्या शाळा-मास्तराकडेच असते, व त्याला त्याबद्दल थोडा भत्ता मिळतो.

**सडका** ( रस्ते ), **सरई** ( धर्मशाळा ), **विहिरी व देवळें**—या संस्था कधीं खासगी मालकीच्या तर कधीं सार्वजनिक असतात. एखादी विहीर किंवा देऊळ एखाद्या जातीनेंच वर्गणी करून बांधलेलें असतें. त्यांच्यावर त्या जातवाल्यांचा ताबा असतो. इतर लोकांना तेथें येऊं देणें न देणें हें अर्थात्च त्यांच्या मर्जीवर अवलंबून असतें. खासगी किंवा विशिष्ट जातीच्या संस्था सोडून दिल्यास, बाकीच्यांचा उपयोग खेड्यांतील कोणाहि इसमाला करतां येतो. त्या संस्था सार्वजनिक होत.

या वरील संस्था व शाळा आणि कांजीहौस यांचा कारभार **बोर्डाकडे** असतो व बोर्डाचीच त्यांच्यावर हुकमत चालते.

पाटील व पटवारी हे सरकारी नोकरच समजले पाहिजेत. त्यांच्यावर जिल्हेसाहेबांची किंवा त्यांनीं नेमलेल्या अधिकाऱ्यांची हुकमत चालते.

पोस्टाचा कारभार परभारें हिंदुस्थान सरकारामार्फत चालतो.

———

## २

# स्थानिक स्वराज्य.

खेड्यांत राहणाऱ्या व निदान दहा रुपये* शेतसारा भरणाऱ्या शेतकऱ्याला बोर्डाच्या निवडणुकींत मत असतें. शेती न करणाऱ्या इसमालाहि त्याचें वार्षिक उत्पन्न तीनशें रुपये असल्यास निवडणुकींत भाग घेतां येतो. पाटील किंवा मालगुजार यांनांहि हा हक्क असतो.

दहा बारा खेड्यांचा एकत्र गट करण्यांत येतो. त्याला सर्कल असें ह्मणतात. प्रत्येक सर्कलमधील मतदार आपल्यापैकींच योग्य अशा एखाद्या माणसाची बोर्डाचा सभासद ह्मणून निवड करून देतात. प्रत्येक तहसीलींत (तालुक्यांत) दहा पंधरा सर्कल असतात, व त्यामुळें दहा पंधरा सभासद प्रत्येक तालुकाबोर्डांत निवडून येतात. ही निवडणूक दर तीन वर्षांनीं होते. त्यामुळें एखाद्या सभासदानें चांगलें काम केलें नाहीं तर लोक त्याला पुनः निवडून देत नाहींत. या भीतीनें प्रत्येक सभासदाला चांगलें काम करणें जरूर असतें. जो चांगलें काम करील अशी मतदारांची खात्री असते त्यालाच त्यांनीं निवडून द्यावें.

प्रत्येक **तहसीली**च्या (तालुका) स्थानिक कारभाराकरितां एक एक **बोर्ड** (कमिटी) सभा असते. त्यांत सरासरी पंधरा ते वीस सभासद असतात. यांच्यापैकीं दोन तीन खेरीज करून बाकीचे सर्व लोकांनीं निवडलेले असतात. प्रत्येक बोर्डांत सरकार दोन तीन सभासद आपल्या तर्फेचे नेमतें. अस्पृश्य किंवा मागसलेल्या जातींचा कोणी सभासद निवडून न आल्यास त्यांच्यातर्फे एखादा दुसरा प्रतिनिधि नेमण्याचा हक्क सरकारास असतो.

---

टीप. * वर्धा, वऱ्हाड वगैरे श्रीमंत भागांत ही मर्यादा १५ रुपयांची आहे.

प्रत्येक बोर्ड आपला अध्यक्ष, उपाध्यक्ष व सेक्रेटरी निवडतें. बोर्डाचे अधिकारी बहुधा लोकांतीलच असतात. कारण बोर्डांत सरकारी सभासद फारच थोडे असतात. हे अधिकारी बोर्डाच्या संमतीनें बोर्डाचा कारभार चालवितात.

या तालुका ( तहसील ) बोर्डावर **डिस्ट्रिक्ट कौन्सिलचा ( जिल्हा बोर्ड )** अधिकार चालतो. प्रत्येक तालुका बोर्ड आपल्या सभासदांतून पांच सहा सभासदांची डिस्ट्रिक्ट कौन्सिलकरितां निवडणूक करतें. याप्रमाणें सर्व तालुका बोर्डांनीं निवडून दिलेले सभासद एकत्र झाले ह्मणजे जुन्या सभासदांतून दोन तीन ते निवडून घेतात, व दोन तीन सरकाराकडून नेमले जातात. याप्रमाणें डिस्ट्रिक्ट कौन्सिल तयार होतें. उदाहरणार्थ, एका डिस्ट्रिक्ट कौन्सिलांत २४ सभासदांची संख्या मंजूर झाली आहे. तर त्यापैकीं $\frac{२}{३}$ ह्मणजे १६ सभासद तालुका बोर्डें आपल्यांतून निवडून पाठवतील. उरलेल्या आठांपैकीं चार सभासदांची निवडणूक हे तालुक्यांतून निवडून आलेले १६ सभासद करतील व चार सभासद सरकार नेमील. ह्मणजे २४ पैकीं २० सभासद लोकांनीं निवडून दिलेले असतात. ह्मणूनच या संस्थांनां **स्थानिक स्वराज्य संस्था** असें ह्मणतात.

प्रत्येक डिस्ट्रिक्ट कौन्सिल आपला अध्यक्ष, उपाध्यक्ष व चिटणीस निवडतें. या लोकपक्षीय अधिकाऱ्यांमार्फतच डिस्ट्रिक्ट कौन्सिलचा कारभार चालतो. डिस्ट्रिक्ट कौन्सिलकडे खालील कामें सोंपविलेलीं असतात.

( १ ) रस्ते तयार करणें; ( २ ) शिक्षण; ( ३ ) देवी टोंचविणें; ( ४ ) जनावरांचे दवाखाने; ( ५ ) धर्मशाळा व विहिरी; ( ६ )

कोंडवाडे ( कांजी हौस ); ( ७ ) बाजार; ( ८ ) नदीनाल्यांवरील उतार; ( ९ ) सांथीच्या प्लेग, कॉलरा वगैरे रोगांवर उपचार करण्याकरितां फिरते दवाखाने; ( १० ) वाचनालयें ( लायब्ररी )—स्थायिक व फिरतीं. डिस्ट्रिक्ट कौन्सिल आपल्या तालुका बोर्डामार्फत हीं कामें पार पाडतें.

**बोर्डाचें उत्पन्न**—शेतसाऱ्यावर रुपयाला एक आण्याप्रमाणें लोकल सेस (करपट्टी) सरकारमार्फत बोर्डासाठीं वसूल करण्यांत येतो. हा कर वाढविण्याचा व जरूर असल्यास दुप्पट करण्याचा अधिकार बोर्डांना हल्लीं मिळाला आहे. याशिवाय कोंडवाडे, बाजार व नदीनाल्यांवरील उताराच्या हक्कांची विक्री यापासूनहि बोर्डाला उत्पन्न मिळतें. रस्त्यावर ठिकठिकाणीं ( टोलपट्टी ) दस्तुरीचीं नाकीं बसवून येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांकडून कर वसूल करण्याचा अधिकारहि बोर्डाला मिळाला आहे. शिक्षण सक्तीचें करावयाचें असल्यास, किंवा दळणवळणाचे मार्ग वाढवून जिल्ह्याची सुधारणा करूं म्हटल्यास कोणता तरी जादा कर बसविणें बोर्डाला भाग आहे. याशिवाय बोर्डाला शिक्षण, आरोग्य व रस्ते यांकरितां सरकारांतून वार्षिक देणग्या मिळतात.

**बोर्डाचा खर्चः**—प्राथमिक व मिडल स्कूलमधील शिक्षकांचे पगार व शालोपयोगी सामान खरेदी करणें, नवे रस्ते तयार करणें व जुने दुरुस्त ठेवणें, शाळेच्या इमारती, धर्मशाळा, कोंडवाडे, गुरांचे दवाखाने व विहिरी बांधणें व जुन्या दुरुस्त ठेवणें या दोन सदरांतच बहुतांशीं होतो. औषधाकरितां फिरत्या व जिल्ह्यांतील इतर स्थायिक दवाखान्यांना बोर्डाकडून मदत होते. पैशाच्या अडचणीमुळें रस्त्याच्या

बाजूला झाडें लावणें, व खेडेगांवांत साफसफाई ठेवणें, इकडे हल्लीं बोर्डाला फारसें लक्ष्य द्यावयास मिळत नाहीं.

**बोर्डाचा अधिकारः**—म्युनिसिपालिट्या असलेलीं गावें सोडून सर्व जिल्हाभर वर दिलेल्या कामांपुरता बोर्डाचा अधिकार चालतो. आपल्या खात्यांच्या कारभारापुरतें बोर्ड स्वतंत्र असतें. बोर्डाच्या निकालावर जिल्हासाहेब, कमिशनर किंवा दिवाण यांच्यापर्यंत अपील अर्ज होऊं शकतात, परंतु स्थानिक स्वराज्यसंस्थांत शक्य तोंपर्यंत हात न घालण्याचें सरकारचें धोरण ठरलें आहे.

**म्युनिसिपालिट्याः**—मोठ्या गांवांत बोर्डाचे सर्व अधिकार या संस्थांकडे असतात. बोर्डाशीं यांचा कोणताच संबंध नसून यांच्यापैकीं प्रत्येक संस्था आपापला कारभार स्वतंत्रपणें चालविते. साधारणतः दहा हजार वस्तीच्या वरच्या प्रत्येक गांवाला म्युनिसिपालिटी असते. यापेक्षां कांहीं कांहीं लहान गांवालाहि म्युनिसिपालिटीचे हक्क मिळाले आहेत. परंतु बहुधा पांच हजार वस्तीच्या गांवाला **नोटीफाईड एरिया कमिटी** असते. लहान प्रमाणावरची ही म्युनिसिपालिटीच होय. यापेक्षां लहान गांवाला **स्यानिटेशन कमिटी** नेमतात.

**मतदारः**—नवीन कायद्याप्रमाणें म्युनिसिपालिटीच्या हद्दींत रहाणाऱ्या २१ वर्षें वयावरील इसमाला, त्याला दहा रुपये महिन्याचें किमानपक्ष उत्पन्न असल्यास मत देण्याचा अधिकार आहे. म्युनिसिपालिटीच्या हद्दींत निवडणुकीपूर्वीं निदान सहा महिने रहात असलेल्या इसमाला मताचा अधिकार दिला जातो. म्युनिसिपालिटीची निवडणूक दर तीन वर्षांनीं होते. गांवचे निरनिराळे मोहल्ले ( पुरे, वार्ड ) पाडलेले असतात. त्यांत राहणारे

मतदार आपल्यापैकींच योग्य असणाऱ्या इसमांस निवडून देतात. एखाद्या मोहल्यांतून दोन सभासद निवडून द्यावयाचे असतील व उमेदवार पांच असले तर ज्या दोघां उमेदवारांना अधिक मतें मिळतील ते निवडून येतात. मतदारांच्या याद्या प्रसिद्ध झाल्या ह्मणजे ज्यांचीं नांवें चुकून त्यांत छापलीं नसतील, त्यांनीं पंधरा दिवसांच्या आंत म्युनिसिपालिटीस अर्ज करून आपलीं नांवें त्यांत दर्ज करून घ्यावीं. नाहींपेक्षां त्यांचा हक्क बुडतो.

निवडणुकीची जागा, तारीख व वेळ प्रथम ठरते व नंतर मतदारांना त्या ठिकाणीं जाऊन आपलें मत द्यावें लागतें. प्रत्येक मतदाराला एक कागद देण्यांत येतो. त्यावर सर्व उमेदवारांचीं नांवें छापलेलीं असतात आपल्याला ज्याला मत द्यावयाचें असेल त्याच्या नांवापुढें × अशी फुली करून तो कागद सही वगैरे न करतां समोर ठेवलेल्या पेटींत टाकावा. यामुळें कोणी कोणाला मत दिलें हें बाहेरच्या लोकांना कळत नाहीं, आणि मतदाराला लोकांचा त्रास होत नाहीं.

**म्युनिसिपालिटीची घटनाः**—सभासदांच्या एकंदर संख्येपैकीं $\frac{3}{4}$ सभासद गांवांतील मतदार निवडून देतात. ह्मणजे २४ सभासद असलेल्या म्युनिसिपालिटींत १८ सभासद मतदार निवडतील. उरलेल्या सहांपैकीं तीन, हे अठरा लोक जुन्या सभासदांतून निवडून घेतील व बाकीचे तीन, सरकार नेमील. ह्मणजे २४ पैकीं २१ सभासद लोकनियुक्त असतात. हे सर्व मिळून आपला **अध्यक्ष** व एक किंवा दोन **उपाध्यक्ष** निवडतात. कमिटीबाहेरील गांवच्या लायक इसमाला देखील, सभासदांची इच्छा असल्यास अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष ह्मणून निवडतां येतें. म्युनिसिपल कमिटीचीं कामें अध्यक्ष किंवा उपाध्यक्षामार्फत चालतात.

## म्युनिसिपालिटीचे अधिकार व तिचीं कामें.

१. **लोकांचें आरोग्य**—दवाखाने उघडणें व औषधपाण्याची तरतूद करणें, देवी टोंचविणें, सांथीच्या रोगांसंबंधीं प्रतिबंधक व निवारक उपाय योजणें, साफसफाई व स्वच्छता राखणें, मलमूत्र गांवाबाहेर योग्य ठिकाणीं नेण्याची व्यवस्था करणें, लोकांना स्वच्छ पाण्याचा मुबलक पुरवठा करणें—या गोष्टी या सदरांत येतात.

२. **लोकांचें शिक्षण**—प्राथमिक शिक्षणाची पूर्ण तजवीज करणें. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करणें हें ध्येय म्युनिसिपालिटीनें आपल्यापुढें ठेवणें जरूर आहे. लोकांसाठीं व्याख्यानें करविणें, वाचनालयें उघडणें, मजूर लोकांकरितां रात्रीच्या शाळा उघडणें—या सर्व गोष्टींचा या सदरांत समावेश होतो.

३. **व्यापार व दळणवळण**—रस्ते बांधणें व दुरुस्त करणें, बाजार व दुकानें, धर्मशाळा आणि सार्वजनिक पाणवठे बांधणें व ते दुरुस्त ठेवणें, व्यापाऱ्यांस व प्रवाशांस सोयीचीं ठिकाणें देणें.

४. **सुख-स्वास्थ्य**—सार्वजनिक ठिकाणीं व रस्त्यावर दिवाबत्ती लावणें, मुलांसाठीं क्रीडांगणें व मोठ्या लोकांसाठीं फिरावयास बागा तयार करणें, करमणुकीचीं साधनें निर्माण करणें, वगैरे.

याशिवाय आपल्या हद्दींतील लोकांच्या आरोग्यासाठीं व शिक्षणासाठीं अनेक गोष्टी म्युनिसिपालिट्यांना करतां येतील.

## म्युनिसिपालिट्यांचें उत्पन्न.

म्युनिसिपालिटीचें बहुतेक उत्पन्न करांपासून येतें. म्युनिसिपालिट्यांना खालील प्रकारचे कर व पट्ट्या बसवितां येतात.

१. **आक्ट्राय**—आपल्या हद्दींतील आयात, निर्गत मालावर जकात.

२. **घरपट्टी**—घरभाड्याचा $\frac{१}{१२}$ भाग वसूल करणें.

३. **व्हील ट्याक्स**—मोटारी, टांगे, बायसिकली, गाड्या वगैरे वाहतुकींच्या साधनांवर बसविलेला कर.

४. **टोलपट्टी**—म्युनिसिपल हद्दींत येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येक गाडीजवळून नाकें बसवून दस्तुरी घेणें.

५. **पाणीपट्टी, भंगीपट्टी**—पाणी पुरवण्याबद्दल व मैला वाहून नेण्याबद्दल कर वसूल करणें.

६. **धंदे व व्यापारपट्टी**—म्युनिसिपल हद्दींत विशिष्ट धंदा किंवा व्यापार करणाऱ्या लोकांकडून कर घेणें.

प्रत्येक म्युनिसिपालटींत हे सर्वच प्रकारचे कर वसूल केले जातात असें नाहीं. परंतु म्युनिसिपालटीला जरूरीप्रमाणें हे कर बसविण्याचा अधिकार मात्र आहे. नवा कर बसविण्यापूर्वीं सरकारची मंजुरी घ्यावी लागते. या उत्पन्नाशिवाय सरकारकडून म्युनिसिपालिटीला थोडीबहुत देणगी ( ग्रँट ) मिळते.

गांवांत पाण्याचे नळ आणण्याकरितां किंवा पक्क्या मोऱ्या व गटारें बांधण्याकरितां म्युनिसिपालिटी सरकारकडून किंवा खासगी कर्ज काढूं शकते व मग आपल्या उत्पन्नांतून हप्तेबंदीनें त्याची व्याजासकट फेड करते. यामुळें लोकोपयोगी कामें सुरू करण्याकरितां पुरेशी शिल्लक पडेतोंपर्यंत म्युनिसिपालिटीनें वाट पाहिलीच पाहिजे, असें नाहीं.

**स्वतंत्रता**—बोर्डाप्रमाणें म्युनिसिपालिटीहि आपल्या कारभारापुरती स्वतंत्र असते. तिच्या निकालावर अपील चालत असलें

तरी तिच्या कारभारांत ढवळाढवळ न करण्याचें धोरण सरकारनें स्वीकारलें आहे. सर्व स्थानिक स्वराज्यसंस्थांना आपलें वार्षिक जमाखर्चाचें बजेट (अंदाजपत्रक) सरकारकडे माहितीकरितां पाठवावें लागतें. परंतु एखाद्या संस्थेला कर्ज असल्यास तिला आपल्या वार्षिक बजेटाला प्रथम सरकारी मंजुरी मिळवावी लागते. या स्थानिक स्वराज्य संस्थांचे हिशोब सरकारी ऑडिटरकडून वेळोवेळीं तपासले जातात. परंतु सार्वजनिक पैशाचा अयोग्य रीतीनें व्यय होऊं नये एवढीच ह्या तपासनिसांची दृष्टि असते. अंतर्गत कारभाराच्या बाबतींत त्या बहुतांशीं स्वतंत्रच असतात.

**कोऑपरेटिव्ह क्रेडिट ब्यांक ( सहकारी पतपेढ्या ):—**

स्थानिक स्वराज्याची तिसरी महत्त्वाची शाखा ह्मणजे या ब्यांका होत. शेतकरी लोकांना थोड्या व्याजानें पैसे कर्जाऊ मिळून त्यांना आपल्या शेतीची सुधारणा करतां यावी, त्याचप्रमाणें कोष्टी वगैरे धंदेवाल्या लोकांच्या धंद्याला थोड्या व्याजावर भांडवल मिळावें या उद्देशानें या ब्यांका निघाल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं एक **सेंट्रल ब्यांक** असते, आणि या ब्यांकेचा कारभार तिच्या हिस्सेदारांनीं निवडून दिलेल्या **डायरेक्टरां** ( अधिकारी मंडळ ) मार्फत चालतो. ब्यांकेंत लोकांच्या रकमा ठेवी ह्मणून घेतल्या जातात व त्यावर ठेवीदारांना बहुधा दरमहा आठ आणे शेकडा व्याज दिलें जातें.

ज्यांना ब्यांकेंतून कर्ज हवें असतें, त्यांना ब्यांकेचे हिस्सेदार व्हावें लागतें. कारण हिस्सेदाराशिवाय इतरांना ब्यांक कर्जाऊ रकम देत नाहीं. प्रत्येक हिस्सा ( शेअर ) अगदीं लहान ह्मणजे दहा रुपयांचा

असतो, त्यामुळें कोणालाच तो घेणें जड जात नाहीं. दहा किंवा अधिक हिस्सेदार एखाद्या गांवीं एकत्र झाले, ह्मणजे ती **सहकारी मंडळी** (कोऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी) ब्यांकेच्या दप्तरांत नोंदली जाते. मंडळांतील एक किंवा अधिक इसमांना कर्जाऊ रकम लागल्यास ती त्या मंडळीच्या नांवें देण्यांत येते. या व्यवस्थेनें सहकारी मंडळांतील सर्व सभासद ब्यांकेला जामीन राहतात. आणि त्या सर्वांचे हितसंबंध गुंतले असल्यामुळें कर्जदारांकडून ब्यांकेचें कर्ज व्याजासह सवडीनें ते वसूल करतात. कारण जर एखाद्या सभासदाकडून कर्ज वसूल झालें नाहीं, तर त्याची जबाबदारी इतर सभासदांवर पडते. लोकांना यामुळें एकमेकांशीं अडीअडचणीला सहकारिता करण्याचें शिक्षण मिळतें. ह्या ब्यांका ठिकठिकाणीं स्थापन झाल्यामुळें गरीब शेतकऱ्यांची किंवा इतर घरगुती धंदेवाल्यांची मोठी सोय झाली आहे. पूर्वी सावकारांच्या जबर व्याजामुळें त्यांची शेतीवाडी व घरेंदारें सावकाराच्या घशांत जात असत, तीं या योजनेमुळें वांचलीं. कारण या ब्यांका फारच माफक ह्मणजे बारा आणे ते रुपया शेकडापर्यंत व्याज आकारतात.

या ब्यांकांचा कारभारहि स्वतंत्रपणें लोकांकडूनच चालतो. त्यांचे हिशोब मात्र सरकारी ऑडिटर वेळोवेळीं तपासतात. त्यामुळें ठेवीदारांना आपल्या पैशाचा भरंवसा वाटतो. सर्व जिल्हा–ब्यांकांचा नागपूर येथील **प्रांतिक ब्यांके**शीं प्रसंगोपात्त व्यवहार चालतो. प्रत्येक जिल्हा–ब्यांक आपापल्या परीनें स्वतंत्र आहे, आणि आपल्या जिल्ह्यांतील सहकारी सभांनांच ती पैसे कर्जाऊ देते. ब्यांकेची व्यवस्था ब्यांकेच्या हिस्सेदारांच्या हातीं असते, आणि हे हिस्सेदार आपले

अधिकारी निवडून देतात. अधिकारीमंडळांत ( डायरेक्टर्स ) सरकार-तर्फे एक सभासद नेमलेला असतो.

प्रांतांतील सहकारी पतपेढ्यांचीं सूत्रें व जमाखर्चाची पाहणी **रजिस्ट्रार** कोऑपरेटिव्ह सोसायटीज् या अधिकाऱ्याच्या हातीं असते. जिल्हा ब्यांकांना तो वेळोवेळीं सल्लामसलत देतो, व त्यांचे जमाखर्च तपासतो. त्याचप्रमाणें लोकांमध्यें सहकारी चळवळीच्या ज्ञानाचा प्रसार करणें हें त्याचें काम समजलें जातें.

याच्या हाताखालीं डेप्युटी रजिस्ट्रार असतात. लोकांना सहकारी चळवळीचें शिक्षण, सहकारी तत्त्वांवर तालुक्याच्या ठिकाणीं कापडाचीं, किंवा किराण्या मालाचीं दुकानें काढणें व तीं नमुनेदार रीतीनें चालवून दाखविणें, अशीं अनेक कामें यांनीं केल्याशिवाय या चळवळीचें पाऊल पुढें पडणार नाहीं.

सहकारी तत्त्वावर चांगलीं सुधारलेलीं आउतें व बीं मागवून शेतीचें उत्पन्न वाढविणें, उत्तम कापसाची लागवड करणें, जनावरांची पैदास चांगली होण्याकरितां सर्वांनीं मिळून चांगला सांड खरेदी करणें, या सर्व सुधारणा सहकारी चळवळीचें लोकांना उत्तम ज्ञान झाल्याशिवाय अमलांत येणार नाहींत. कारण व्यक्तिशः हिंदुस्थानांतील शेतकरी फार गरीब असतो. त्यामुळें या गोष्टी त्याच्या आटोक्याबाहेर असतात.

# जिल्हा व त्याचा कारभार

राज्यकारभाराच्या सोयीकरितां हिंदुस्थानचे जे लहानलहान भाग पाडले आहेत त्यांना 'जिल्हा' असें नांव आहे. एकंदर ब्रिटिश हिंदुस्थानांत २६७ जिल्हे आहेत. त्यांपैकीं आपल्या प्रांतांत २२ जिल्हे आहेत. यांपैकीं १८ मध्यप्रांतांत असून ४ वऱ्हाडांत मोडतात. चार पांच जिल्ह्यांच्या गटाला **कमिशनरी** असें नांव आहे.

नागपूर, जबलपूर, नर्मदा, छत्तीसगड या चार मध्यप्रांतांतील व वऱ्हाड ही पांचवी स्वतंत्र अशा पांच कमिशनऱ्या आपल्या प्रांतांत आहेत. कमिशनरीच्या मुख्य अधिकाऱ्याला **कमिशनर** असें ह्मणतात. जिल्हाधिकाऱ्यांच्या कामावर नजर ठेवणें व जिल्हाधिकाऱ्यांच्या मुलकी ( जमिनीसंबंधीं सारा, वांटणी वगैरे बाबत ) निकालावरील अपीलें ऐकणें हीं दोनच याचीं मुख्य कामें होत. मद्रास प्रांतांत कमिशनर नाहींत. त्यामुळें जिल्हाधिकाऱ्यांचा व्यवहार सरळ प्रांतिक सरकारशीं होतो.

जिल्हाधिकाऱ्याला **डेप्युटी कमिशनर** ( कलेक्टर ) असें ह्मणतात. सामान्य लोक त्याला **जिल्हेसाहेब** ह्मणतात. त्यांच्या दृष्टीनें जिल्हेसाहेब ह्मणजे मुख्य सरकार ! कारण आपल्या जिल्ह्यापुरते सर्व अधिकार याला असतात. जिल्हेसाहेब आपल्या जिल्ह्याचा नबाब असतो, असें ह्मटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. अर्थात् सरकारी कायद्यांनीं या नबाबाची सत्ता मर्यादित झालेली असते. जिल्ह्यांतील सारा वसूल करण्याची जबाबदारी याच्यावर असते. वऱ्हाडांत **रयतवारी** पद्धति चालू आहे. ह्मणजे प्रत्येक शेतकरी प्रत्यक्ष सरकारला जबाबदार असतो, व सरकारापासून ठराविक सारा भरण्याच्या

अटीवर जमीन त्याला मिळालेली असते. तेथें शेतासंबंधीं हक्कनोंदणी, अदलाबदल, शेताची पोटविभागणी वगैरे सर्व तंट्यांचा निकाल जिल्हे-साहेबालाच करावा लागतो. मध्यप्रांतांत **मालगुजारी** पद्धति चालू आहे. ह्मणजे शेतकरी व सरकार या दोघांमध्यें मालगुजार हा दलाल असतो. शेतकरी आपला ठराविक सारा मालगुजारापाशीं देतो, आणि आपल्या गांवांतील वसूल केलेल्या साऱ्यापैकीं शेंकडा चाळीस स्वतःकरितां ठेवून उरलेल्या साठांचा भरणा मालगुजार सरकारी खजिन्यांत करतो. यामुळें शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष संबंध सरकारशीं येत नाहीं. मालगुजार व शेतकरी यांच्यामधील तंट्यांचा निकाल लावून दोघांच्याहि हक्कांचें संरक्षण करण्याचें काम त्याच्याकडेच असतें.

डेप्युटी कमिशनर हा जिल्ह्याचा **मुख्य मॅजिस्ट्रेट** असतो. यामुळें फौजदारी गुन्हे झाले तर आरोपी पकडून त्यांचा न्याय करण्याची मुख्य जबाबदारी त्याच्यावर असते. जिल्ह्यांत शांतता व सुराज्य राखण्याची सर्व जबाबदारी त्याच्यावरच असते. त्यामुळें जंगलखातें, शाळा, दवाखाने व स्थानिक स्वराज्यसंस्था यांच्यावरहि त्याला देखरेख ठेवावी लागते. जिल्ह्यांतील लोकांच्या चालीरीति, गरजा व अडचणी यांची माहिती मिळवून त्यांची योग्य तजवीज करणें हें त्याचें काम आहे. त्याचप्रमाणें जिल्ह्यांतील सार्वजनिक किंवा राजकीय अशी कोणतीहि महत्त्वाची बाब असली तरी त्याला सर्व माहिती ठेवून ती वेळच्यावेळीं वरिष्ठ अधिकाऱ्यास कळवावी लागते. प्रांतिक सरकारचे सर्व हुकूम याच्या मार्फतच अमलांत आणले जातात, व जिल्ह्यांतील हालहवाल याच्या मार्फतच प्रांतिक सरकारला कळते.

जिल्हेसाहेबाच्या हाताखालीं खास मदतनीस ह्मणून जिल्ह्यांतील कामकाजाच्या मानानें चार पांच **छोटे साहेब** असतात. त्यांना **असिस्टंट कमिश्नर** किंवा **एक्सट्रा असिस्टंट कमिश्नर** असें नांव असतें. यांना **पहिल्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटचे** अधिकार असतात. ह्मणजे २ वर्षेंपर्यंत सजा व १००० रु. दंड करण्याचा यांना अधिकार असतो. शिवाय मुलकी कामाचे अधिकारहि यांना दिलेले असतात. यांच्यापैकीं एक जण सरकारी खजिन्याचें काम पाहतो. जिल्ह्यांतील मुलकी व फौजदारी कामें यांच्या मदतीनेंच जिल्हेसाहेब करीत असतो. रयतेच्या गरजा समजावून घेण्याकरितां व प्रत्यक्ष वस्तुस्थिति पाहण्याकरितां हे सर्व अधिकारी दौरा करीत असतात. त्यामुळें जिल्ह्यांतील लोकांशीं त्यांची ओळख होते व लोकांचीं सुखदुःखें अधिकाऱ्यांना सहज रीतीनें कळतात.

जिल्ह्यांतील सारावसुली **तहसीलदारांच्या** मार्फत होते. पटवारी व रेवेन्यु इन्स्पेक्टर हे त्याचे मुख्य हस्तक होत. प्रत्येक जिल्ह्याचे जे पोटविभाग केलेले असतात, त्यांना **तहसील** (तालुका) असें नांव असतें, व त्यावरील अधिकाऱ्याला तहसीलदार असें ह्मणतात. तहसिलींतील जमाबंदी व इतर चिल्लर कामावर याला देखरेख करावी लागते. तहसीलदाराला **दुसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटचे** अधिकार दिलेले असतात. ह्मणजे तो सहा महिने सजा व दोनशें रुपयेपर्यंत दंड करूं शकतो. त्याच्या मुख्य मदतनिसाला **नायब तहसीलदार** ह्मणतात. याला **तिसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटचे** अधिकार असतात. याला एक महिना सजा व ५० रुपये दंडापर्यंतचा अधिकार असतो. तहसिलींतील लहानसहान गुन्हे त्यामुळें हे अधिकारी परभारें निकालांत काढतात. यांच्या निकालावर अर्थात्च जिल्हेसाहेबाकडे अपील होऊं शकतें.

**जिल्हेसाहेबाचे इतर मदतनीसः**—शांतता राखण्याच्या कामीं जिल्हेसाहेबाचा मुख्य मदतनीस **कप्तानसाहेब** ( डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस ) हा होय. जिल्ह्यांतील सर्व पोलीस ठाणीं (नाकीं) याच्या ताब्यांत असतात, आणि प्रत्येक पोलीस ठाण्यावर एकएक **सब इन्स्पेक्टर** असतो. तो आपल्या टापूंतील शांततेकरितां याला जबाबदार असतो. **जिल्ह्यांत गुन्हे घडूं न देणें,** व झालेच तर आरोपींस पकडून त्यांना मॅजिस्ट्रेटपुढें न्यायाकरितां उभे करणें हें याचें मुख्य काम आहे. आरोपींचा न्याय होऊन त्यांना शिक्षा झाली तर त्यांना तुरुंगांत पोहोंचविण्याची जबाबदारी याच्यावरच असते. ही जबाबदारी तो आपले दुय्यम अधिकारी ( डेप्युटी सुपरिंटेंडेंट, इन्स्पेक्टर) व पोलीस यांच्या मदतीनें पार पाडतो. कोठेंहि दंगाधोपा झाला तर याला जिल्हेसाहेबाजवळ जाब द्यावा लागतो.

२. दवाखाने व आरोग्य यांची व्यवस्था **सिविल सर्जन**कडे असते. मुख्य ठिकाणचा दवाखाना चालवून शिवाय जिल्ह्यांतील इतर लहानलहान सरकारी किंवा म्युनिसिपालिटीच्या दवाखान्यांवर हा देखरेख ठेवतो. जिल्हा तुरुंगावरील मुख्य अधिकारी हाच होय. जेलर याच्या हुकुमानें चालतो. देवी टोंचणें, सांथींत प्लेगची लस टोंचणें वगैरेवरहि याला देखरेख ठेवावी लागते. बोर्ड व म्युनिसिपालिट्या यांना आरोग्य व साफसफाईविषयीं सल्लामसलत देण्याचें काम याच्याकडेच असतें. याच्या मदतनिसांना **असिस्टंट सर्जन** व असिस्टंट मेडिकल ऑफिसर अशीं नांवें आहेत.

**३. एक्सिक्युटिव एंजिनीअर** ( पी. डब्ल्यू. डी. )–सरकारी इमारती, पूल व रस्ते यांच्यावर देखरेख ठेवून त्यांची वार्षिक मरामत करणें,

नवीन इमारती किंवा रस्ते सरकारला बांधावयाचे असल्यास त्यांचे नकाशे करून मग त्यांचें बांधकाम करणें, हीं सर्व याचीं कामें होत. याला असिस्टंट एंजिनीअर व ओव्हरसीअर असे मदतनीस असतात.

४. **फॉरेस्ट ऑफिसर** (जंगलसाहेब)—जंगलाची व्यवस्था ठेवण्याचें काम या अधिकाऱ्याकडे असतें. जंगलाची नासाडी होऊं न देण्याचा व जंगलांतील उत्पन्न वाढविण्याचा हा प्रयत्न करतो. याच्या हाताखालील लोकांना **रेंजर** असें ह्मणतात.

५. **एक्साईज ऑफिसर** ( अबकारीसाहेब )—दारू, भांग, अफू वगैरे नशाचे पदार्थ विकणाऱ्या दुकानांपासून कर वसूल करणें, त्यांची वेळोवेळीं तपासणी करणें, हे पदार्थ विकण्याचे परवाने देणें व त्यांचा दुरुपयोग होत नाहीं हें पाहणें, आणि नियम मोडणारांना पकडून कोर्टापुढें शिक्षेसाठीं उभें करणें, हीं याचीं कामें होत. याच्या हाताखालीं अबकारी सब इन्स्पेक्टर असतात.

६. **डेप्युटी इन्स्पेक्टर**—बोर्ड व म्युनिसिपालिट्या यांच्या ताब्यांत असलेल्या प्राथमिक व मिडल शाळांची तपासणी करून विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणें, व शिक्षकांना अभ्यासासंबंधीं सूचना देणें हीं यांचीं कामें होत.

७. **सुपरिन्टेंडेंट ल्यांड रेकार्डस**—जिल्ह्यांतील सर्व जमिनींच्या हक्कांचें नोंदणी दफ्तर व नकाशे याच्याजवळ असतात. रेवेन्यू इन्स्पेक्टर व पटवारी यांच्या मदतीनें हा आपलें काम करतो. खेड्यांचे नकाशे हा तयार करतो.

८. **न्यायखातें**—प्रत्येक जिल्ह्यांत किंवा लहान जिल्हे असल्यास दोन जिल्हे मिळून एक जिल्हा न्यायाधीश असतो. याला **डिस्ट्रिक्ट**

**आणि सेशन जज्ज** ह्मणतात. मध्यप्रांतांत फक्त ११ डिस्ट्रिक्ट जज्ज आहेत. यांच्यावर प्रांतांतील वरिष्ठ कोर्टाची सत्ता चालते. याला खालील अधिकार असतातः—

( १ ) खुनाचे मुकद्दमे चालवून आरोपींना फांशी किंवा काळे-पाण्याची सजा देणें.

( २ ) तिन्ही वर्गांच्या **पगारी व ऑनररी** (लोकांपैकींच थोड्याशा घरंदाज व हुशार लोकांना सरकार सन्मानार्थ मॅजिस्ट्रेटचे अधिकार देतें ) मॅजिस्ट्रेट लोकांनीं केलेल्या फौजदारी निकालांचीं अपिलें ऐकणें.

( ३ ) फार मोठाले दिवाणी दावे चालविणें.

( ४ ) दिवाणी दाव्यांतील खालच्या कोर्टांतील निकालावर अपील ऐकणें.

( ५ ) जिल्ह्यांतील सर्व कोर्टांची तपासणी करणें.

याचा अधिकार अर्थात्च न्यायखात्याच्या दृष्टीनें खुद्द डेप्युटी कमिश्नर व जिल्ह्यांतील सर्व मॅजिस्ट्रेट यांच्यावर चालतो. याच्या हाताखालीं दिवाणी दाव्यांचा निकाल करण्याकरितां प्रत्येक तहसीलींत एक किंवा दोन **सबजज्ज** असतात. त्याचप्रमाणें जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं याशिवाय याला एक **दोन** खास मदतनीस असतात, त्यांनां **ॲडिशनल डिस्ट्रिक्ट जज्ज** ह्मणतात. सबजज्जांचे दोन दर्जे असतात. पहिला व दुसरा. दुसऱ्या दर्जाच्या सबजज्जांना पूर्वीं **मुन्सीफ** ह्मणत असत. मोठ्या शहरीं कांहीं सबजज्जांना लहान लहान दावे **झटपटीनें** चालविण्याचा अधिकार दिलेला असतो. त्यांनां **स्माल काज् कोर्ट जज्ज** ह्मणतात. या निरनिराळ्या सबजज्जांचे अधिकार वरिष्ठ कोर्ट ठरवून देतें.

# प्रांतिक सरकार

हिंदुस्थानचे एकंदर पंधरा प्रांत पाडलेले आहेत. त्यापैकीं सहा प्रांत लहान असून तेथील राज्यकारभार जुन्या पद्धतीनेंच चालतो. हे सहा प्रांत मागसलेले असल्यामुळें त्यांना मांटेग्यू–चेम्सफोर्डचा सुधारणा–कायदा अजून लागू केलेला नाहीं.

१. **दिल्ली प्रांत**—यावर चीफ कमिश्नर आहे. दिल्ली ही हिंदुस्थान सरकारची राजधानी असल्यामुळें, दिल्लीपुरता लहानसा प्रांत निराळा करण्यांत येऊन त्याच्यावर स्वतंत्र चीफ कमिश्नरची नेमणूक केली आहे.

२. **वायव्येकडील सरहद्दीचा प्रांत**—लोक आडदांड असल्यामुळें व सरहद्दीच्या संरक्षणाचें महत्त्व जाणून येथेंहि एका स्वतंत्र चीफ कमिश्नरची योजना केली आहे.

३–४. **ब्रिटिश बलुचिस्तान व अजमीर मारवाडा**—या प्रांतांचा कारभार हिंदुस्थान सरकारच्या पोलिटिकल एजंट मार्फत चालतो.

५. **कूर्ग**— या प्रांताचा कारभार म्हैसूर संस्थानच्या रेसिडेंट-मार्फत चालतो.

६. **आंदमान**—या बेटांचा कारभार असाच एका स्वतंत्र चीफ कमिश्नरमार्फत चालतो. हिंदुस्थानांतील काळे पाण्याचे (जन्म ठेपीचे) कैदी येथें पूर्वीं पाठविले जात असत.

* * * * *

बाकीच्या नऊ प्रांतांत—मुंबई, मद्रास व बंगाल हे तीन इलाखे, व संयुक्तप्रांत, पंजाब, बहार–ओरिसा, मध्यप्रांत–वऱ्हाड,

आसाम व ब्रह्मदेश हे सहा मोठे प्रांत, यांत सुधारणा--कायदा लागू करण्यांत आला असून प्रत्येकावर **गवर्नरची** नेमणूक करण्यांत आली आहे. गवर्नरच्या मदतीला एक कार्यकारी मंडळ असून त्यांत **एक्झि-क्युटिव कौन्सिलर्स** (कार्यकारी सभासद) व **दिवाण** (मिनिस्टर्स) यांचा समावेश होतो. कार्यकारी सभासद व दिवाण यांचा पगार व दर्जा कायद्यानें सारखा ठरविला आहे. दिवाणांची स्वार्थत्याग कर-ण्याची इच्छा असल्यास ते कमी पगार घेतात. प्रांतिक सरकारच्या ताब्यांत असलेल्या खात्यांचे दोन वर्ग केले आहेत.

१. **राखीव खातीं**—प्रांतिक कालवे, शेतसारा, दुष्काळ-निवारण, न्याय, पोलीस, तुरुंग, करवसुली, जंगल व सरकारी कर्ज या खात्यांचा कारभार गवर्नर आपल्या कार्यकारी सभासदांच्या सल्ल्यानें चालवितो. या खात्यांबद्दल गवर्नर किंवा त्याचे कार्यकारी सभासद हे निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींस जबाबदार नाहींत.

२. **सोंपीव खातीं**—शेतकी, आरोग्य, दवाखाने, शिक्षण, अब-कारी, स्थानिक स्वराज्य खातें, उद्योगधंदे, पब्लिक वर्क्स, ( इमारती, रस्ते वगैरे ) रजिस्ट्रेशन, जन्ममरण व विवाह नोंदणी, धार्मिक व धर्मादाय नेमणुकी, वजनेंमापें व पदार्थसंग्रहालयें या खात्यांचा कारभार गवर्नर दिवाणांच्या मार्फत चालवितो हे दिवाण लोक-प्रतिनिधींतूनच नेमण्यांत येतात, व आपापल्या खात्यांच्या कारभारा-बद्दल लोकप्रतिनिधींना जबाबदार असतात. या अधिकारविभागणीमुळें नवीन राज्यव्यवस्थेला **द्विदल राज्यपद्धति** असें नांव मिळालें आहे.

प्रांताचें आकारमान व महत्त्व यांप्रमाणें तेथें कार्यकारी सभासद व दिवाण आणि कायदेमंडळाचे सभासद किती असावे हें ठरविलें

आहे. आपल्या मध्यप्रांतांत दोन कार्यकारी सभासद आहेत. **त्यापैकीं एक हिंदी इसम असतो.** शिवाय सोपीव खात्याकरितां दोन दिवाण नेमण्यांत येतात. त्यांची नेमणूक गवर्नर करतो. परंतु कायदेमंडळांतील लोकनियुक्त सभासदांचे पुढारी व त्यांच्या विश्वासास पात्र अशा इसमांचीच नेमणूक त्याला करणें भाग असतें. एरवीं सोपीव खात्यांचा कारभार दिवाणांना करणें अशक्य होईल. कारण त्या खात्यांवर कायदेमंडळाचा अधिकार चालतो. यामुळें दिवाणांची कायदेमंडळानें निवडणूक करण्याची पद्धति लवकरच प्रचारांत येईल असें वाटतें. आपापल्या खात्यापुरते त्यांना पूर्ण अधिकार असतात खरे, परंतु त्यांनीं दिलेला निकाल फिरविण्याचा गवर्नरला अधिकार आहे. निरनिराळ्या सोपीव खात्यांचे मुख्य अधिकारी दिवाणांच्या सल्ल्यानें आपल्या खात्यांचे कारभार चालवितात. दिवाण व कार्यकारी सभासद यांचा दर्जा समसमान समजला जातो. कार्यकारी सभासद फक्त गवर्नरलाच जबाबदार असतात. दिवाण मात्र एकीकडे गवर्नरला व दुसरीकडे लोकप्रतिनिधींनां जबाबदार असतात. कोणाचीहि नामर्जी झाली तरी त्यांना राजीनामा द्यावा लागतो.

**प्रांतिक कायदेकौन्सिल ( मंडळ )**—गवर्नर, दिवाण व कार्यकारी सभासद यांना प्रांतिक कायदेमंडळाच्या सल्ल्यानें चालावें लागतें. सोपीव खात्यापुरता प्रांतिक कायदेमंडळाचा सल्ला बंधक आहे पण राखीव खात्यांची गोष्ट मात्र तशी नाहीं. कायदेमंडळाच्या इच्छेविरुद्ध वाटल्यास वागण्याचा गवर्नरला हक्क आहे. मात्र हा हक्क त्याला फार जपून वापरावा लागतो.

**मध्यप्रांतांतील कौन्सिलांत—**

५४ निवडून आलेले प्रतिनिधि,
८ सरकारी अधिकारी,
२ कार्यकारी सभासद,
६ सरकार नियुक्त सभासद,

असे एकंदर ७० सभासद आहेत. *

सरकारनियुक्त सहांपैकीं

१ यूरोपियन व अँग्लो-इंडियन समाजतर्फे;
१ मंडला **जिल्ह्याचा** प्रतिनिधि;
१ मध्यप्रांतांतील जमीनदार व जहागिरदारांतर्फे;
२ अस्पृश्य आणि मागासलेल्या लोकांतर्फे;
१ इतर बाबींतर्फे;

अशी विभागणी असते. ह्मणजे ७० सभासदांपैकीं फक्त १० सरकारी अधिकारी असतात व ६० लोकप्रतिनिधि असतात. या साठांपैकीं ५४ तर लोकांनीं प्रत्यक्ष निवडलेले असतात. याप्रमाणें प्रांतिक कायदेमंडळांत लोकपक्षाचें चांगलें बहुमत आहे. इतर प्रांतांतहि अशीच व्यवस्था आहे. कारण सुधारणा-कायद्याअन्वयें निदान **शेंकडा ८० प्रतिनिधि लोकनियुक्त असले पाहिजेत** व सरकारी अधिकारी कायदेमंडळांत शेंकडा २० पेक्षां अधिक राहूं शकत नाहींत.

कायदेमंडळाचे प्रतिनिधि निवडण्याकरितां खालील गट केले आहेतः-मुसलमानी धर्माचे लोक सोडून इतर-

### ( १ ) शहरवासी लोकांतर्फे—

**वऱ्हाड**—अमरावती शहर व कँप, एलीचपूर व परतवाडा, आणि यवतमहाल १

टीप—* मुंबई ११४; मद्रास ११८; बंगाल १२५; संयुक्त प्रांत ११८; पंजाब ८३; बिहार-ओरिसा ९८; आसाम ५३; ब्रह्मदेश १०३.

| | |
|---|---|
| अकोला, अकोट, मूर्तिजापूर, कारंजा, मलकापूर, खामगांव व शेगांव | १ |
| **मध्यप्रांत**—जबलपूर | १ |
| मुरवाडा, दमो, सागर, शिवनी व मंडला | १ |
| रायपूर, धमतरी, बिलासपूर व द्रुग | १ |
| हुशंगाबाद, हरदा, शिवणी माळवा, खंडवा, बऱ्हाणपूर, नरसिंगपूर, गादरवाडा, छिंदवाडा व बैतुल | १ |
| नागपूर व कामठी | २ |
| उमरेड, वर्धा, हिंगणघाट, आर्वी, चांदा, वरोडा, भंडारा, गोंद्या, व बालाघाट | १ |
| | ९ |

वऱ्हाडांतील म्युनिसिपल हद्दींत राहणाऱ्या **मुसलमान मतदारांतर्फे** १

असे दहा प्रतिनिधि शहरवासी लोक निवडून देतात. १०

( २ ) **खेड्यांतील लोकांतर्फे**—वर दिलेलीं गांवें सोडून बाकीचा सर्व प्रांत मतदानाच्या दृष्टीनें खेड्यांतच मोडतो.

मध्यप्रांत-वऱ्हाडांतील खेड्यांत राहणाऱ्या लोकांना, त्यांच्या लोकसंख्येच्या मानानें ३७ प्रतिनिधि निवडून देतां येतात. त्यांची वांटणी खालीं दिल्याप्रमाणें आहे. **मुसलमान नसलेल्या** लोकांतर्फे—

| | | |
|---|---|---|
| (१०) **वऱ्हाड**—उमरावती तहसील | १ | उमरावती जिल्हा. ३ |
| चांदूर व मोर्शी तहसील | १ | |
| एलीचपूर व दर्यापूर ,, | १ | |

| | | | |
|---|---|---|---|
| अकोला व मूर्तिजापूर | त. १ | अकोला जिल्हा. | ३ |
| बाळापूर व अकोट | त. १ | | |
| मंगरूळ व वाशीम | त. १ | | |
| मलकापूर व जळगांव | त. १ | बुलढाणा जिल्हा. | २ |
| चिखली, मेहकर व खामगांव | त. १ | | |
| यवतमहाल, केळापूर व वणी | त. १ | यवतमहाल जिल्हा. | २ |
| दारवा, व पुसद | त. १ | | |
| (२१) **मध्यप्रांत**. जबलपूर व पाटण | त. १ | जबलपूर जिल्हा. | २ |
| मुरवाडा व सिहोरा | त. १ | | |
| पूर्ण सागर जिल्हा | | | १ |
| ,, दमो ,, | | | १ |
| ,, शिवनी ,, | | | १ |
| रायपूर व बलोदा बाजार | त. १ | रायपूर जिल्हा. | २ |
| धमतरी व महासमुंद | त. १ | | |
| संपूर्ण बिलासपूर जिल्हा | | | १ |
| ,, द्रुग ,, | | | १ |
| ,, हुशंगाबाद ,, | | | १ |
| ,, नेमाड ,, | | | १ |
| ,, नरसिंगपूर ,, | | | १ |
| ,, छिंदवाडा ,, | | | १ |
| ,, बैतूल ,, | | | १ |
| नागपूर व रामटेक त. | १ | नागपूर जिल्हा. | २ |
| उमरेड, काटोल व सावनेर | १ | | |

| | | | |
|---|---|---|---|
| वर्धा त. | १ | वर्धा जिल्हा. | २ |
| आर्वी व हिंगणघाट त. | १ | | |
| पूर्ण चांदा जिल्हा | | | १ |
| ,, भंडारा ,, | | | १ |
| ,, बालाघाट ,, | | | १ |
| **मुसलमानेतर लोकांचे खेड्यांतील प्रतिनिधि:—** | | | ३१ |

**मुसलमान लोकांतर्फे:—**

| | |
|---|---|
| नागपूर कमिश्नरी | १ |
| जबलपूर ,, | १ |
| नर्मदा ,, | १ |
| छत्तीसगड कमिश्नरी | १ |
| पूर्व वऱ्हाड | १ |
| पश्चिम वऱ्हाड | १ |
| **मुसलमानांतर्फे खेड्यांतील प्रतिनिधि:—** | ६ |
| **एकूण खेड्यांतील लोकांतर्फे** | ३७ |

**(३) विशिष्ट-मतदारसंघ**

| | |
|---|---|
| जबलपूर व नर्मदा कमिशनरींतील जमीनदार | १ |
| नागपूर व छत्तीसगड ,, | १ |
| वऱ्हाडांतील ,, | १ |
| मध्यप्रांत-वऱ्हाडांतील खाणीवाले | १ |
| मध्यप्रांतांतील कारखानदार व व्यापारी कंपन्या | १ |
| वऱ्हाडांतील ,, ,, | १ |
| नागपूर युनिवर्सिटी | १ |
| | ७ |
| **एकूण लोकनियुक्त प्रतिनिधि** | ५४ |

यापैकीं खास वऱ्हाडांतील असे १७ प्रतिनिधि असतात. ३५ खास मध्यप्रांतांतील असतात, व उरलेल्या दोन जागांवर मध्यप्रांत किंवा वऱ्हाड यापैकीं कुठलाहि प्रतिनिधि येऊं शकतो. वऱ्हाडांतील सर्व प्रतिनिधींची प्रथम वास्तविक निवडणूक होते, परंतु पुढें **त्यांची नेमणूक सरकारनें केल्यावरच त्यांनां कायदेमंडळांत जातां येतें.** वऱ्हाड हा निजामचा प्रांत ब्रिटिश सरकारकडे वहिवाटण्याकरितां कायमपट्टीनें आला आहे. ह्मणून असा दुहेरी प्रकार करावा लागतो. वरिष्ठ कायदेमंडळांतील वऱ्हाडच्या प्रतिनिधींना हाच नियम लागू आहे.

**मतदानाचा हक्क:**—किमान तीन रुपये महिना घरभाडें भरणारा भाडेकरी किंवा तसल्या घराचा मालक यास मत देण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणें जिल्ह्याच्या मानानें ३० पासून ५० रुपये पर्यंत वार्षिक शेतसारा भरणारा प्रत्येक इसम मत देऊं शकतो. लष्करी पेन्शनरांनाहि मतदानाचा अधिकार मिळाला आहे. मात्र मत देणाऱ्या इसमाचें वय निदान २१ वर्षें असावें लागतें. कोणत्याहि प्रांतांतील स्त्रियांस मतदानाचा हक्क त्या प्रांतिक कौन्सिलच्या मर्जीनें मिळूं शकतो. त्यांनाहि अर्थात् याच शर्ती लागू आहेत. गटांतील कोणत्याहि मतदाराला प्रतिनिधि ह्मणून निवडून येण्याकरितां उमेदवार उभें राहतां येतें. कोर्टानें ज्यांनां पागल ठरविलें आहे किंवा ज्यांनां सहा महिन्यांपेक्षां अधिक एखाद्या गुन्ह्याबद्दल सक्तमजुरीची शिक्षा झालेली आहे, त्यांनां शिक्षा संपून पांच वर्षें झालीं नसल्यास मत देण्याचा अधिकार प्राप्त होत नाहीं. मतदारांच्या याद्या प्रसिद्ध झाल्यावर ज्यांचीं नांवें चुकून त्यांत नोंदलीं गेलीं नसतील, त्यांनां एक महिन्याच्या आंत

डिस्ट्रिक्ट जज्जाकडे अर्ज करून आपलीं नांवें नोंदवितां येतात. कौन्सिलची निवडणूक साधारणपणें दर तीन वर्षांनीं होते. मात्र गव्हर्नरनें आपल्या अधिकारांत मध्येंच कौन्सिल मोडल्यास, सहा महिन्यांच्या आंत फेर निवडणूक केली पाहिजे.

**प्रांतिक कायदेकौन्सिलचें कार्यक्षेत्र व अधिकार**—प्रांतिक जमाखर्चाचा खर्डा ( बजेट ) दर वर्षी कौन्सिलपुढें ठेवून तें मंजूर करून घ्यावें लागतें. त्या वेळीं त्यांत फेरफार करण्याचा कौन्सिलला अधिकार असतो. राखीव खात्यांच्या बाबतींत मात्र गव्हर्नरला आपल्या अधिकारांत सर्टिफिकेट ( दाखला ) देऊन कौन्सिलनें नामंजूर केलेली रकम जरूर असल्यास खर्च करतां येते. त्याचप्रमाणें सोंपीव खात्यांतहि सेक्रेटरी ऑफ स्टेटकडून नेमणूक झालेल्या बड्या सनदी नोकरांच्या पगार-पेन्शनाबाबत कौन्सिलला कांहीं कमजास्त करतां येत नाहीं. पार्लमेंटच्या किंवा हिंदुस्थान सरकारच्या अधिकाराला बाध येईल असे कायदे प्रांतिक कौन्सिल करूं शकत नाहीं. परंतु कौन्सिलला प्रांतिक बाबीसंबंधीं ठराव पास करण्याचा व नवे कायदे करण्याचा किंवा जुने दुरुस्त करण्याचा अधिकार आहे. कौन्सिलनें पास केलेले ठराव व कायदे, त्याविरुद्ध विशिष्ट कारणें असल्याशिवाय गवर्नरला अमलांत आणावे लागतात. त्याचप्रमाणें सरकारला एखादा नवा कायदा पास करावयाचा असल्यास तो कौन्सिलपुढें मांडणें भाग असतें. गवर्नर व कायदेकौन्सिल यांत मतभेद झाला तर सर्टिफिकेट देऊन तो कायदा पास करण्याचा गवर्नरला अधिकार आहे; मात्र त्याला गवर्नर जनरल व स्टेट सेक्रेटरी यांची प्रथम संमति मिळवावी लागते. कायदेकौन्सिलांतील कोणत्याहि सभासदास प्रश्न विचारून

माहिती मागतां येते, त्याचप्रमाणें ठराव किंवा बिल कौन्सिलपुढें विचाराकरितां मांडतां येतें. **सभासदांना कौन्सिलांत पूर्ण भाषण-स्वातंत्र्य असतें.** कौन्सिलचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यापुढें सभासदां-कडूनच निवडण्यांत येतील.

**प्रांतिक सरकारचा जमाखर्च**—प्रांतिक सरकारच्या उत्पन्नाच्या मुख्य बाबी ह्मटल्या ह्मणजे

| | मध्यप्रांताचें सरासरी उत्पन्न | | |
|---|---|---|---|
| १ जमीन महसूल | २॥। | कोटि | रुपये |
| २ अबकारी | १॥। | ,, | ,, |
| ३ दिवाणी स्टँप | -॥- | ,, | ,, |
| ४ जंगल खातें | -॥- | ,, | ,, |
| बाकीच्या खात्यांचें चिल्लर उत्पन्न | १ | ,, | ,, |
| | ६॥ | कोटि रुपये वार्षिक उत्पन्न. | |

उत्पन्नाची वाढ करावयाची असल्यास प्रांतिक सरकारास खालील कर बसविण्याचा अधिकार आहे:—

१ नाटकें, सिनेमा वगैरे मनोरंजनाच्या साधनांवर;

२ विशिष्ट चैनीच्या पदार्थांवर;

३ जाहिरातींवर;

४ शेतकीशिवाय इतर कामास लावतां येणारे जमिनीवरील कर;

५ दस्तऐवजी नोंदणी व स्टांप;

कारण नवीन कर बसविल्याशिवाय प्रांताची सुधारणा करणें आज जवळजवळ अशक्य झालें आहे.

## खर्चाच्या मुख्य बाबीः—

| | सरासरी खर्च. | |
|---|---|---|
| जमीन महसूल | ६० लक्ष | रुपये राखीव |
| जंगल | ३५ ,, | |
| राज्यकारभार | ६० ,, | |
| न्यायखातें | ४० ,, | |
| तुरुंग | १५ ,, | |
| पोलीस | ६० ,, | |
| कर्जावरील व्याज व हिंदुस्तान सरकारचें देणें | ४५ ,, | |
| पाटबंधारे | ३५ ,, | |
| शिक्षण | ६० ,, | सोंपीव |
| दवाखाने व आरोग्य | २५ ,, | |
| शेतकी व उद्योगधंदे | २५ ,, | |
| इमारती व रस्ते | ८० ,, | |
| चिल्लर खर्च | ९० ,, | |

एकूण खर्च ६ कोटि ३० लक्ष रुपये.

प्रांतिक सरकारचा जमाखर्च ठेवण्यासाठीं एक स्वतंत्र कचेरी आहे. **अकौंटंट जनरल** हा त्यांतील मुख्य अधिकारी असून त्याच्यावर हिंदुस्थान सरकारचा अधिकार चालतो. योग्य अधिकाऱ्याच्या परवानगीनें व बजेटला धरून खर्च होतो कीं नाहीं, हें पाहण्याचें याचें काम असतें. प्रांतांतील सर्व खजिन्यावर याची हुकमत चालते. कोणत्याहि खात्याचें आलेलें उत्पन्न खजिन्यांत प्रथम जमा करावें लागतें, व नंतर त्यांतून प्रत्येक खात्याकरितां लागणाऱ्या खर्चाची रकम लागेल तशी उचलावी लागते.

**वरिष्ठ न्यायकोर्टः**—मध्यप्रांतांतील मुख्य न्यायकोर्ट नागपूर येथें असून त्यावरील मुख्य न्यायाधिशाला **जुडिशिअल कमिशनर** असें ह्मणतात. त्याला जे मदतनीस न्यायाधीश असतात, त्यांना ॲडिशनल ज्युडिशियल कमिश्नर असें ह्मणतात. डिस्ट्रिक्ट व सेशन जज्जांनीं किंवा सबजज्जांनीं किंवा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटांनीं दिलेल्या कोणत्याहि फौजदारी किंवा दिवाणी खटल्यांचीं अपीलें ऐकण्याचा या न्यायकचेरीला अधिकार आहे. या वरिष्ठ न्यायकोर्टाच्या निवाड्यावर अपील फक्त विलायतेंतील **प्रिव्ही कौन्सिलपुढेंच** चालूं शकतें. वरील न्यायकोर्टें स्वतंत्र असतात व त्यांच्यावर प्रांतिक सरकारचा किंवा हिंदुस्थान सरकारचाहि न्यायदानाच्या बाबतींत ताबा चालत नाहीं. वरिष्ठ न्यायकोर्टाच्या स्वातंत्र्यामुळें ब्रिटिश न्यायाची इभ्रत जगभर पसरली आहे.

खालच्या कोर्टाच्या फैसल्यावरील अपीलें ऐकणें, खालच्या कोर्टाचें काम सुरळित चालण्याकरितां त्यांच्या पृथक् पृथक् अधिकारमर्यादा ठरवून देणें, न्यायपद्धतीचे नियम बांधून देणें, व प्रसंगविशेषीं त्यांचीं कोर्टें तपासणें हीं कामें ज्युडिशिअल कमिश्नर करीत असतो.

त्याचप्रमाणें वरिष्ठ कोर्टांत येणारीं कोणतीं अपीलें कोणीं ऐकावीं हें तोच ठरवितो. प्रसंगविशेषीं दोन किंवा तीन कमिश्नर एकत्र बसून एखादें महत्त्वाचें अपील ऐकतात. नागपूर येथें हल्लीं ४ ॲडिशनल व एक मुख्य असे पांच ज्युडिशियल कमिश्नर आहेत. निदान दहा वर्षें नोकरी केलेला आय. सी. एस्. किंवा तितकींच वर्षें वरिष्ठ कोर्टांत वकिली करणारा इसमच या जागीं नेमला जातो.

दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही कोर्टांवर ज्युडिशिअल कमिशनरचा अधिकार चालतो, व अपील त्याच्याकडे होतें. तपासणी (रिविजन) किंवा अपीली अधिकाराच्या दृष्टीनें खालील तक्ता दिला आहे.

- ज्युडिशिअल कमिश्नर
  - स्मॉलकॉज जज्ज.
  - डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज
    - सब जज्ज वर्ग १ व वर्ग २
    - डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट
      - मॅजिस्ट्रेट वर्ग २ व ३.
    - मॅजिस्ट्रेट वर्ग १

दिवाणी कोर्टें हिंदी व यूरोपियन अशा सर्वांचेच दिवाणी दावे निकालांत काढतात. मात्र फौजदारी खटल्यांत यूरोपियन आरोपींचा खटला चालविण्याचा अधिकार फक्त डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटास आहे. शिवाय तो **यूरोपियन ज्यूरी** ( पंच ) मागूं शकतो. हिंदी आरोपींना हा नियम लागू नाहीं. खुनाच्या खटल्यांत सेशन्स जज्जाच्या मदतीस गांवांतील दोनतीन प्रतिष्ठित इसम **असेसर्स** ह्मणून बोलावतात. पण त्यांचें मत जज्जानें ऐकलेंच पाहिजे असें नाहीं.

**प्रांतिक न्यायमंत्री** ( लीगल रिमेंब्रन्सर )—हा कायदेकौन्सिलचा चिटणीस असतो. कायद्यांचे मसुदे करण्याच्या व इतर कायदेशीर बाबतींत हा प्रांतिक सरकारला सल्लामसलत देतो.

**प्रांतिक सरकारचीं खातीं:**—प्रांतिक सरकारच्या हाताखालीं प्रत्येक खात्याचा प्रमुख असतो. तो प्रांतिक सरकारचा सल्ला घेऊन आपल्या खात्याचा कारभार चालवितो.

**जमाबंदी**—दर वीस वर्षांनीं जमिनीची पाहणी सेटलमेंट होऊन मालकाळीची रकम ठरविण्यांत येते. ही मुदत लवकरच तीस वर्षांची होईल. सारा वाढण्याची मधल्या काळांत भीति नसल्यामुळें शेतकऱ्याला जमिनीची सुधारणा करण्यास वाव मिळतो. वऱ्हाडांत रयतवारी व मध्यप्रांतांत मालगुजारी अशा दोन पद्धति अमलांत आहेत. वऱ्हाडांत थोड्याशा गांवांत मालगुजाराप्रमाणेंच **इजारदार** आहेत. मध्यप्रांतांतील मालगुजार आपल्या गांवांतील शेतसाऱ्यांपैकीं शेकडा साठ सरकारांत भरतात व चाळीस स्वतःकरितां ठेवतात. त्यामुळें सेटलमेंटच्या वेळीं शेतसारा वाढला तर मालगुजारांचा फायदा होतो. वऱ्हाडांत तसें नाहीं. शेतकरी व सरकार या दोघांत तेथें मध्यस्थ कोणी नाहीं. या खात्याच्या मुख्य अधिकाऱ्याला **सेटलमेंट कमिशनर** असें ह्मणतात. जमिनीच्या हक्काच्या नोंदणीचें काम याच्याकडेच असतें. प्रत्येक जिल्ह्यांत **सुपरिंटेंडंट ल्यांड रेकार्ड** हा याच्या तर्फें हेंच काम करीत असतो. त्याचप्रमाणें ज्या जिल्ह्यांत सेटलमेंट होत असेल तेथील **सेटलमेंट ऑफिसर**, व त्याचे असिस्टंट याच्या हुकुमाखालीं काम करतात. मोठ्या शहरांत जी सरकारी जमीन असते तिला **नझूल** ह्मणतात. तिची विक्री व व्यवस्था या अधिकाऱ्याच्या मार्फत होते. या अधिकाऱ्याकडेच प्रांतांतील दस्तऐवजांची नोंदणी करण्याचें खातें ( रेजिस्ट्रेशन ) असतें. प्रत्येक जिल्ह्यांत पांच सहा ठिकाणीं नोंदणी-कचेऱ्या असतात. त्यांच्या अधिकाऱ्यांना **सबरजिस्ट्रार** ह्मणतात. एखादा दस्तऐवज नोंदला गेला ह्मणजे तो हरवला तरी त्याची पर्वा राहत नाहीं, कारण सरकारांतून त्याची नक्कल वाटेल तेव्हां मिळूं शकते. तिन्ही खातीं हा सांभाळतो.

**पोलीस**—या खात्याच्या मुख्याला **इन्स्पेक्टर जनरल ऑफ् पोलीस** असें ह्मणतात. याच्या हाताखालीं दोन खास मदतनीस असतात. सर्व प्रांतभर शांतता राखणें व गुन्हे पकडून गुन्हेगारांना शिक्षा देणें हें याचें काम आहे. जिल्ह्यांतील कप्तानसाहेब व पोलीस याच्या हाताखालीं असतात. आगगाडींत घडणाऱ्या गुन्ह्यांच्या बंदोबस्तासाठीं **रेलवे पोलीसची** स्वतंत्र व्यवस्था केलेली असते. राजकीय गुन्हे धरण्यासाठीं **गुप्त पोलीस** असतात. या सर्वांवर याची देखरेख असते. प्रत्येक जिल्ह्यांत शिवाय थोडे **रिझर्व पोलीस** असतात. त्यांचा प्रसंगविशेषीं उपयोग करण्यांत येतो.

**तुरुंग**—या खात्याच्या मुख्याला **इन्स्पेक्टर जनरल ऑफ् प्रिझन्स** ह्मणतात. तुरुंगांत सर्व प्रकारचे कैदी ठेवले जातात. त्यांच्या खाण्यापिण्याची साधी पण आरोग्यकारक व्यवस्था असते. साधे व दिवाणी कैदी यांच्यापासून तुरुंगांत काम घेतलें जात नाहीं. बाकीच्यांपासून सक्त मजुरी घेतली जाते. कैद्यांना तुरुंगांत एखादा दुसरा धंदा शिकवितात. विणणें, छापणें, बांबूकाम, सत्रंज्या तयार करणें वगैरे कामें तुरुंगांत होतात. नागपूर, जबलपूर व अमरावती येथील तुरुंग मोठे असून त्यांत लांब मुदतीच्या शिक्षा झालेले कैदी ठेवण्यांत येतात. **अल्पवयी गुन्हेगारांकरितां** जबलपूर येथें **रिफार्मेटरी स्कूल** आहे. येथें मुलांनां सुतारी, लोहारी वगैरे धंदेशिक्षण आणि थोडेंसें लिहिणेंवाचणें शिकविलें जातें. ह्मणजे तुरुंगांतून सुटका झाल्यावर त्यांनां नीतिमार्गानें श्रम करून पोट भरतां येतें. इतर जिल्ह्यांतहि तुरुंग आहेतच. वाईट वागणाऱ्या कैद्यांना, तुरुंगांत अंधारकोठडी, बेड्या, किंवा फटके अशा शिक्षा मिळतात. ज्यांचें वर्तन चांगलें असतें त्यांनां शिक्षेच्या मुदतीची सूट मिळते.

**आरोग्य**— मुख्य अधिकारी **डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ.** मॅजिक लँटर्नच्या द्वारें याच्या हाताखालील अधिकारी आरोग्याचें ज्ञान लोकांत पसरवितात. फिरते दवाखाने व सांथीचे दवाखाने आणि त्यांचे डॉक्टर याच्या ताब्यांत असतात, आणि जरूरीप्रमाणें हा त्यांना निरनिराळ्या यात्रेंत, मेळ्यांत, किंवा रोगांची सांथ असेल तेथें पाठवितो. स्थानिक स्वराज्यसंस्थांनां हा आरोग्यविषयक सल्लामसलत देतो.

**अबकारी**—मुख्य अधिकारी **एक्साईज कमिशनर.** दारू व इतर मादक पदार्थांच्या पैदाशीवर व विक्रीवर याचें नियंत्रण असतें परवान्यानें मादक पदार्थ विकणारापासून कर वसूल करणें, व बिगरपरवाना विकणारे किंवा पैदाशी करणारे यांना पकडून शिक्षा करणें हीं याचीं कामें होत. प्रत्येक जिल्ह्यांत याच्या हाताखालीं एक्साईज ऑफिसर व इन्स्पेक्टर आणि सब इन्स्पेक्टर असतात. या खात्याचें उत्पन्न जबर आहे. परंतु दारूविक्री हळुहळू कमी करण्याचें सरकारनें ठरविलें आहे

**दवाखाने**— मुख्य अधिकारी, **इन्स्पेक्टर जनरल ऑफ सिविल हॉस्पिटल्स.** हा प्रांतांतील सर्व दवाखान्यांची व्यवस्था पाहतो, प्रत्येक जिल्ह्यांतील सिविल सर्जन याच्या हाताखालीं असतो.

**शेती व उद्योगधंदे**—मुख्य अधिकारी **डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ॲंड इंडस्ट्रीज,** शेती सुधारण्याकरितां निरनिराळ्या ठिकाणीं सरकारी शेतांवर ( फार्म ) प्रयोग करणें व ते लोकांना दाखविणें, उत्तम बीबियाणें, सुधारलेलीं शेतीचीं अवजारें व पाण्याचे पंप लोकांत लोकप्रिय करणें, जनावरांची पैदास चांगली करण्याचे प्रयत्न, वगैरे कामें हा करीत असतो. याच्या हाताखालील **डेप्युटी**

**डायरेक्टर** हे ज्ञानप्रसाराचें कार्य करीत असतात. शिवाय ठिक-ठिकाणीं नमुनेदार प्रयोगांचीं शेतें चालवून दाखवितात. उद्योगधंद्यांची तपासणी, कारखान्यांची नीट व्यवस्था, कामकरी लोकांचें हित व आरोग्य यांची पाहणी, त्याचप्रमाणें नवीन उद्योगधंद्याच्या योजना तयार करणें हीं देखील याचीं कामें होत त्यासाठीं याच्या हाताखालीं इन्स्पेक्टर्स नेमले असतात.

**शिक्षण**—मुख्य अधिकारी **डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन.** प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणीं एक सरकारी हायस्कूल आहे, व तालुक्यांत इंग्रजी मिडलस्कूल आहे. शिवाय कांहीं हायस्कुलें खाजगी संस्थांचीं व कांहीं मिशनऱ्यांचीं आहेत. मिडलस्कूलें बहुतेक म्युनिसिपालिट्या व बोर्डें यांचींच आहेत. या सर्व शाळांची तपासणी आणि सरकारी शाळांची तपासणी व व्यवस्था तो **सर्कल इन्स्पेक्टर** लोकांच्या मदतीनें करतो. प्राथमिक शाळांची तपासणी **डेप्युटी इन्स्पेक्टर** करतात. प्राथमिक शाळा म्युनिसिपालिट्या व बोर्डें यांच्याच आहेत.

याशिवाय एंजिनीअरिंग, औद्योगिक, शेतकी व डॉक्टरी अशा शाळा नागपुरांत आहेत. त्यांची व्यवस्था त्या त्या खात्यांच्या स्वाधीन आहे.

विद्यालयें (कॉलेजें–सरकारी व मिशनरी) युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमापुरतीं तिच्या कक्षेंत असतात. परंतु नागपूर, अमरावती व जबलपूर येथील सरकारी कॉलेजें, दरदोन जिल्हेमिळून असलेलीं मराठी शिक्षक तयार करणारीं नार्मल स्कूल्स व मुलींचें शिक्षण या सर्वांच्या व्यवस्थेवर डायरेक्टरची हुकमत चालते. जबलपूर येथील ट्रेनिंग कॉलेज व नागपूरचें सायन्स कॉलेज सरकारी आहेत.

**नागपूर युनिवार्सिटी**—गवर्नर हिचा मुख्य अधिकारी (**चान्सेलर**) असतो. व्हाइसचान्सेलरची निवडणूक कोर्टकडून होते. युनिवर्सिटी कोर्टांतील सभासदांची निवडणूक पदवीधरांच्याकडून होते व कांहीं सरकारकडून नेमण्यांत येतात व कांहीं कॉलेजांतील शिक्षक व प्रोफेसर मिळून निवडून देतात, तर इतर अधिकारपरत्वें युनिवर्सिटींत राहतांत. वरिष्ठ परीक्षांचा अभ्यासक्रम आंखणें, संशोधन, वरिष्ठ शिक्षणाची सोय करणें आणि परीक्षा घेऊन पदव्या देणें या गोष्टी युनिवर्सिटीच्या अधिकारांत आहे.

**रस्ते व इमारती**--मुख्य अधिकारी **चीफ एंजिनीअर.** यांच्या हाताखालीं **सुपरिंटेंडिंग एंजिनीअर** व एक्झिक्युटिव एंजिनीअर असतात.

**पाटबंधारे**--मुख्य अधिकारी चीफ एंजिनीअर.

**जंगलखातें**--मुख्य अधिकारी **चीफ कान्सर्वेटर.** याच्या हाताखालीं कान्सर्वेटर असतात.

**प्राप्तीवरील कर**—प्रांतांतील मुख्य अधिकाऱ्याला **इनकम टॅक्स कमिशनर** असें ह्मणतात.प्रत्येक जिल्ह्यांत याच्या हाताखालीं **कलेक्टर** असतात, व ते हिशोबतपासनिसांच्या मदतीनें हा कर वसूल करतात व हिंदुस्तान सरकारकडे पाठवितात. वार्षिक २००० रुपये उत्पन्नापर्यंत हा कर भरावा लागत नाहीं. २०००–५००० उत्पन्न असल्यास रुपयास ५ पै, ५००० ते १०००० पर्यंत रुपयास ६ पै, १०००० ते २०००० पर्यंत रुपयास ९ पै, व नंतर रुपयास एक आणा याप्रमाणें हा कर वाढता आहे.फार नफा होणाऱ्यांना याशिवाय **सुपर–टॅक्स** ह्मणून जादा कर भरावा लागतो. हें खातें प्रांतिक सरकारचें नसून, हिंदुस्थान सरकारचें आहे.

———

# हिंदुस्तान सरकार

हिंदुस्तान सरकारला मदतनीस अशीं दोन प्रमुख कायदेमंडळें आहेत.

**१. लेजिस्लेटिव असेंब्ली:**—अध्यक्ष व उपाध्यक्ष यापुढें सभासदांकडून निवडले जातील.

**२. कौन्सिल ऑफ स्टेट:**—अध्यक्षाची नेमणूक सरकारकडून होते.

नव्या सुधारणाकायद्यान्वयें यांची स्थापना करण्यांत आली आहे. यापैकीं पहिल्या मंडळांत लोकनियुक्त सभासदांचें बहुमत असतें, व दुसरींत तें नसतें. मात्र या दोन्ही मंडळांनीं पास केल्याशिवाय कोणत्याहि बिलाला कायद्याचें स्वरूप येऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें वार्षिक बजेटहि दोन्ही सभेंत पास व्हावें लागतें. तसें झालें नाहीं तर **गव्हर्नर जनरलला** आपल्या अधिकारांत सर्टिफिकेट देऊन राज्यकारभार चालवावा लागतो. सरकारी कर्ज व त्यावरील व्याज, वरिष्ठ सनदी नोकरांचे पगार व पेन्शनें, सैन्य, आरमार, विलायतेंतील खर्च या बाबतींत या दोन्ही मंडळांला मत देण्याचा किंवा वादविवाद करण्याचा अधिकार नाहीं. त्यांनीं प्रदर्शित केलेलें मत शिफारसवजा मानण्यांत येतें. परंतु बहुसंख्याक लोकप्रतिनिधींच्या मताविरुद्ध वारंवार जाणें गवर्नर जनरललाहि फारसें इष्ट नाहीं; कारण त्यामुळें तो लोकांच्या रोषास पात्र होतो. एखादें बिल एका मंडळानें पास केलें व दुसऱ्यानें तें फेंकून दिलें तर गवर्नर जनरलला त्या कायद्यावर सही करतां येते; मात्र अशा स्थितींत त्याला

तें बिल पार्लमेंटकडे पाठवून व तेथील सभासदांच्या माहितीकरितां तीस दिवस तेथें ठेवून स्टेट सेक्रेटरीची संमति मिळविल्यानंतरच तो कायदा अमलांत आणतां येतो.

दोन्ही मंडळांतील सभासदांना प्रश्न विचारून माहिती मागविण्याचा व खासगी ठराव व बिलें आणण्याचा अधिकार आहे. मात्र हे ठराव व बिलें पास झाल्यानंतर स्वीकारणें न स्वीकारणें गवर्नर जनरलच्या हातीं आहे. परंतु प्रत्येक बाबींत लोकमताच्या विरुद्ध जाणें गवर्नर जनरललाहि शक्य नसतें. त्यामुळें हिंदुस्तान सरकारवर या नव्या कायदेमंडळांचा चांगलाच दाब पडतो, यांत संयश नाहीं. कारण सरकारचा वारंवार पराभव झाल्यावर पुष्कळशा सुधारणा सरकारला अर्थात्‌च कराव्या लागतात.

हिंदुस्थानच्या उद्योगधंद्याच्या हिताकरितां जकातीच्या बाबतींत बरेच अधिकार कायदेमंडळाला मिळाले आहेत. हिंदुस्थानांतील उद्योग-धंद्याच्या संरक्षणाकरितां एखाद्या परकीय मालावर जकात बसविण्याचें कायदेमंडळानें ठरविलें तर गवर्नर जनरलला तें बहुधा ऐकावेंच लागतें. कारण हिंदी धंद्यांना त्यामुळें मदत होऊन शिवाय हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न वाढतें, त्यामुळें गवर्नर जनरलला फारसे आक्षेप घेतां येत नाहींत. कारण हिंदुस्थानचें हित न पहातां विलायतेंतील कार-खानदारांचें हित मी पाहीन असें तो कसें ह्मणूं शकेल? आणि कायदे-मंडळ व गवर्नर जनरल यांचें एकमत झाल्यास स्टेट सेक्रेटरीला त्यांत ढवळाढवळ करतां येत नाहीं.

**हिंदुस्थान सरकारचें कार्यकारी मंडळ**—या मंडळांत बहुधा आठ सभासद असतात, व त्यांच्या साहाय्यानेंच गवर्नर जनरल

आपला राज्यकारभार चालवितो. या आठांपैकीं **तीन सभासद हिंदी असेलच** पाहिजेत अशी सुधारणा-कायद्याची सक्ति आहे कार्य-कारी मंडळांतील एकंदर सभासदांची संख्या आठांपेक्षां अधिक वाढविण्याचा गवर्नर जनरलला अधिकार आहे. हिंदुस्तान सरकारच्या या अष्ट प्रधानांच्या कामाची वांटणी खालीलप्रमाणें असते. सेनापति व व्हाइसरॉय सोडले ह्मणजे वास्तविक हल्लीं सहाच सभासद आहेत.

**१. परराष्ट्रीय खातें**—संस्थानें व चीन, इराण, तिबेट, अफगाणिस्तान हीं परराष्ट्रें यांच्यांशीं खलबतें व राजकारण, रेसिडंट व एजंटांची नेमणूक, छोट्या सहा प्रांतांच्या काराभारावर देखरेख, राजकुमारांचें शिक्षण, व संस्थानांतील साम्राज्यसेवेकरितां ठेवलेलें सैन्य यासंबंधीं धोरण या खात्यांतून चालतें. हें खातें व्हाइसराय साहेब स्वतः पाहतात.

**२. अंतर्व्यवस्था खातें**—न्याय, पोलीस, तुरुंग यांची व्यवस्था, सनदी नोकरांवर हुकमत, ऐतिहासिक इमारतींची डागडूज, वरिष्ठ सरकारची लायब्ररी व रेकार्ड ( दफ्तर ) व प्रांतिक काराभारावर हुकमत व देखरेख, इतक्या गोष्टींचा यांत समावेश होतो. हें खातें हातीं असलेल्या कार्यकारी कौन्सिलच्या सभासदाला **होम मेंबर** ह्मणतात.

**३. कायदेकानू खातें**—नवीन कायदे बनविणें व जुन्यांत फेरबदल सुचविणें, बिलांचे मसुदे तयार करणें व दुसऱ्या खात्यांस आणि वरिष्ठ सरकारास कायद्यासंबंधीं सल्लामसलत देणें. या खात्याच्या सभासदाला **कायदेमंत्री** ह्मणतात.

**४. फडणविशी**—प्रांतिक सरकारच्या जमाखर्चावर देखरेख, उत्पन्नावरील कर गोळा करणें, चलनी नाण्यांची पद्धति, विमा,

टांकसाळी, बँका यांचा कारभार पाहणें, नवीन कर सुचविणें, जमाखर्चाचा खर्डा तयार करणें, सरकारी कर्ज, पोस्ट व तारखातें, एतद्देशीय संस्थानांकडून येणारी खंडणी, जकाती, अफू या हिंदुस्थान सरकारच्या खास खात्यांची व्यवस्था पाहणें, या बाबींचा या खात्यांत समावेश होतो. या मंत्र्याला **फडणवीस** ह्मणतात.

५. **जमीन महसूल व शेतकी**—शेतसारावसुलीचे नियम करणें, साऱ्याची पद्धति व आकार ठरविणें, दुष्काळनिवारक कामें, पूल, पाटबंधारे, मोठ्या सडका या प्रांतिक कारभारांतील बाबींवर नजर ठेवणें, शेतीच्या उत्पन्नाचीं व पीकपाण्याचीं अंदाजपत्रकें व माहिती प्रसिद्ध करणें व शेतकी सुधारण्याचे प्रयोग करणें या बाबींचा यांत अंतर्भाव होतो.

६. **व्यापार व उद्योग**—कोळशांच्या खाणी, वाहतुकीचीं साधनें, औद्योगिक भरभराटीच्या योजना करणें व इतरांनीं केलेल्या तपासून मत देणें, मजूरांच्या कामाचे तास ठरविणें व त्यांच्या सुख-सोयीची आणि शिक्षणाची व्यवस्था करणारे कायदे पास करणें वगैरे बाबींचा यांत समावेश होतो.

७. **शिक्षण व आरोग्य**—सर्व प्रकारचें शिक्षण, आरोग्य, म्युनिसिपालिट्या व जिल्हाबोर्डें यांची व्यवस्था या खात्याकडे असते.

८ **लष्कर**—यांत खडें व बैठें सैन्य, तटबंदी, कोटकिल्ले, नाकेबंदी, सैन्याला लागणारा सरंजाम वगैरे बाबींचा अंतर्भाव होतो. मुख्य सेनापतीच्या स्वाधीन हें खातें असतें व ते कार्यकारी मंडळाचे जादा सभासद असतात.

कार्यकारी मंडळांतील या सभासदांच्या नेमणुकी कायदेमंडळाच्या संमतीनें होत नाहींत. हे कायदेमंडळाला जबाबदार नसतात व

कायदेमंडळाची सत्ताहि यांच्यावर चालूं चकत नाहीं. प्रत्येक सभासद गवर्नर जनरलच्या सल्ल्यानें आपल्या खात्याचा कारभार इतर सभासदांना विचारल्याशिवाय चालवीत असतो. सर्व सभासदांच्या एकत्र बैठकी फारच थोड्या होतात, आणि त्यांतहि थोड्याशाच गोष्टींबद्दल विचारविनिमय होतो.

**लेजिस्लेटिव असेंब्लीची घटना**—या सभेंत निरनिराळ्या

| | |
|---|---|
| प्रांतांतील लोकांनीं किंवा संस्थांनीं निवडलेले | १०३ |
| सरकारी अधिकारी | २६ |
| सरकारनियुक्त सभासद | १५ |
| | १४४ |

असे एकूण १४४ सभासद असतात.

मध्यप्रांत वऱ्हाडतर्फे सहा सभासद या सभेकरितां निवडले जातात. त्यापैकीं १ मुसलमान असतो, [ प्रांतांतील मुसलमानांतर्फे. ]

,, १ वऱ्हाडचा प्रतिनिधि;
,, १ नागपूर कमिश्नरीतर्फे;
,, २ नर्मदा, जबलपूर व छत्तीसगड या तीन कमिश्नऱ्यांतर्फे,
,, १ मध्यप्रांतांतील जमीनदारांतर्फे;

एकूण ६

**असेंब्लीचा मतदारः—**

(१) निरनिराळ्या जिल्ह्यांप्रमाणें ९० ते १५० रुपये शेतसारा भरणारा;

(२) नागपूर किंवा जबलपूर अशा मोठ्या शहरांत वीस रुपये महिना घरभाडें भरणारा व इतरत्र किमान पंधरा रुपये महिना भाडें देणारा भाडेकरी किंवा त्या घराचा मालक;

(३) प्राप्तीवरील कर भरणारा;

या सदरांत येणाऱ्या प्रत्येक एकवीस वर्षांवरील इसमाला असेंब्ली-साठीं मत देण्याचा अधिकार आहे. कोणताहि मतदार निवडणुकीसाठीं उमेदवार राहूं शकतो.

**कौन्सिल ऑफ स्टेटची घटना**—या सभेंत एकंदर ६० सभासद असून त्यापैकीं ३४ निवडलेले व २६ सरकारनें नेमलेले असतात. सरकारनें नेमलेल्या सभासदांत सरकारी अधिकारी काय-द्यानें वीसपेक्षां अधिक राहूं शकत नाहींत. मध्य प्रांतातर्फे १ व वऱ्हाडतर्फे १ असे दोन सभासद या सभेकरितां आपल्या प्रांतांतून निवडले जातात. फक्त या सभेच्या सभासदांनाच 'नामदार' हें उपपद लावतां येतें.

## कौन्सिल ऑफ स्टेटचा मतदार.

१. ५००० रुपये वार्षिक सारा भरणारा इसम;

२. वीस हजार रुपयांपेक्षां अधिक उत्पन्नावर कर भरणारा;

३. शहर म्युनिसिपालिटीचा किंवा जिल्हा बोर्डाचा बिनसरकारी चालू किंवा पूर्वींचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष;

४. वरिष्ठ किंवा प्रांतिक कायदे कौन्सिलचा हल्लींचा किंवा पूर्वी कधीं असलेला सभासद;

५. युनिवर्सिटी सीनेटचा हल्लींचा किंवा पूर्वी कधीं असलेला सभासद किंवा फेलो;

६. शमुसुल उलमा अथवा महामहोपाध्याय.

यापैकीं कोणत्याहि सदरांत पडणारा इसम मतदार होऊं शकतो व कोणत्याहि मतदाराला उमेदवार ह्मणून उभें राहतां येतें. २१

पेक्षां कमी वयाचा, पागल, किंवा शिक्षा झालेला इसम अर्थात्‌च कोणत्याहि निवडणुकींत मत देण्याला पात्र समजला जात नाहीं.

हिंदुस्थानच्या या दोन वरिष्ठ कायदे मंडळांतील लोकनियुक्त सभासदांचें प्रांतवार वर्गीकरण खालीं दिलें आहे.

| प्रांत | असेंब्ली | कौन्सिल ऑफ स्टेट. |
|---|---|---|
| मुंबई. | १६ | ६ |
| मद्रास. | १६ | ५ |
| बंगाल. | १७ | ६ |
| संयुक्त प्रांत. | १६ | ५ |
| पंजाब | १२ | ३ |
| बिहार—ओरीसा. | १२ | ४ |
| मध्यप्रांत—वऱ्हाड. | ६ | २ |
| आसाम. | ४ | १ |
| ब्रह्मदेश. | ४ | २ |
| एकूण | १०३ | ३४ |

## हिंदुस्थान सरकारचा जमाखर्चः—

| जमा....मुख्य उत्पन्नाच्या बाबी | सरासरी उत्पन्न |
|---|---|
| १ जकात. | ३३ कोटि रुपये |
| २ प्राप्तीवरील कर. | २० ,, |
| ३ रेल्वे. | २७ ,, |
| ४ मीठ. | ६ ,, |
| ५ अफू | ३॥ ,, |
| ६ टांकसाळ | ३ ,, |

| | |
|---|---|
| ७ पोस्ट व तार | १॥। कोटि रुपये |
| ८ व्याज | ३॥। ,, |
| ९ संस्थानिकांकडून व प्रांतिक सरकाराकडून खंडणी | ९ ,, |
| १० चिल्लर उत्पन्न | ८ ,, |
| सरासरी एकंदर उत्पन्न | ११५ कोटि. |

या खात्यांची व्यवस्था हिंदुस्थान सरकारच्या हातीं आहे, आणि त्यांचें उत्पन्नहि हिंदुस्थान सरकारला परभारें मिळतें. या खात्यांच्या कारभाराशीं किंवा उत्पन्नाशीं प्रांतिक सरकारचा कांहींच संबंध नसतो.

**खर्च.**

| **खर्चाच्या मुख्य बाबी** | **सरासरी खर्च.** |
|---|---|
| १. लष्कर | ६६॥ कोटि. |
| २. व्याज | १३ ,, |
| ३. राज्यकारभार | ८॥ ,, |
| ४. रेल्वे | २३ ,, |
| ५. हुंडणावळ | ४ ,, |
| ६. पेन्शनें | २॥ ,, |
| ७. इतर खात्यांवरील खर्च | ७॥ ,, |
| सरासरी एकूण खर्च | १२५ कोटि. |

गेल्या वर्षी उत्पन्न १३३ कोटि व खर्च १४२ कोटि होता.

जमाखर्चाच्या या अंदरबट्ट्यामुळें हिंदुस्तान सरकारला वारंवार कर्ज काढावें लागलें, आणि ही कर्जाची रकम ९०० कोटि रुपयांच्या घरांत आजला गेली आहे.

सरकारनें यासंबंधीं **इंचकेप** कमिटी बसवून तिच्या शिफारसीं-प्रमाणें खर्चांत काटकसर करण्यास सुरवात केली आहे, आणि चालू सालच्या जमाखर्चाचा मेळ साधारण ठीक बसला आहे.

हिंदुस्थानास वसाहतीच्या दर्जाचें स्वराज्य द्यावयाचें हा सुधारणा कायद्याचा प्रधान हेतु आहे, आणि त्या धोरणानें हिंदुस्थानच्या राज्यकारभारावर लोकप्रतिनिधींचा दाब दिवसेंदिवस बसत चालला आहे. पुढें मागें लवकरच बऱ्याच प्रांतांना अधिक अधिकार ( प्रांतिक स्वायत्तता—प्रांतिक बाबीपुरतें स्वातंत्र्य ) व हिंदुस्तान सर-कारच्या कारभारांत लोकप्रतिनिधींना अधिक हक्क मिळण्याचा संभव आहे. दर दहा वर्षांनीं हिंदुस्तानच्या कारभाराची तपासणी एखाद्या बादशाही कमिशनकडून करवून अधिक हक्क देण्याची तरतूद सुधारणा-कायद्यांत केलेलीच आहे. कदाचित् हें कमिशन लवकर देखील येईल.

**लष्कर**—हिंदुस्थानचें सैन्य अडीच लक्ष आहे. त्यापैकीं ७५००० यूरोपियन आहेत व उरलेल्या हिंदी सैन्यांत **शीख, गुरखे, मराठे, रजपूत,** व **पठाण** यांचाच भरणा विशेष आहे. हिंदुस्थानांतील या लढ-वय्या जाति होत. हें सर्व सैन्य सर सेनापतीच्या हुकमतीखालीं असतें. एकंदर सैन्याचे तीन पोट विभाग असून प्रत्येकावर एक सेनापति आहे. सैन्यापैकीं बराचसा भाग वायव्य सरहद्दीवर ठेवला आहे. कारण खुष्कीनें तिकडूनच हिंदुस्थानावर स्वारी होण्याचा संभव असतो. याशिवाय ब्रिटिश सरकारच्या मदतीकरितां ह्मणून २०००० सैन्य संस्थानांच्या खर्चानें ठेवलें आहें तें निराळें. मीरत, लखनौ, लाहोर, रावळपिंडी, पेशा-वर, केटा, महू, कामठी, पुणें व शिकंदराबाद, या मुख्य लष्करी छावण्या होत. सरहद्दीवर पठाण, रोहिले वगैरे पुंड लोकांच्या पलटणी उभारून

त्यांच्याकडून सरहद्दीचा बंदोबस्त करून घेण्यांत येतो, कारण ते तिकडील माहीतगार असतात. हे सरासरी १२००० आहेत.

बैठें सैन्य प्रसंगविशेषीं उभारतां येतें. त्याचा उपयोग अडी-अडचणीच्या वेळीं देशांत बंदोबस्त ठेवण्याकडे होतो. यूरोपियन व हिंदी व्हालंटीअर मिळून ४०००० आहेत. ते वर्षांतून महिना पंधरा दिवस लष्करी शिक्षण घेतात व एरवीं आपल्या पोटापाण्याचा स्वतंत्र उद्योग करतात. कॉलेजांतील विद्यार्थीहि व्हालंटीअर पलटणींत सामील झालेले कांहीं असतात. पेन्शनीवर गेलेल्या परंतु कामाला लायक असलेल्या ३६००० शिपायांचाहि वेळ प्रसंगीं उपयोग होऊं शकतो. याशिवाय आसाम व ब्रह्मदेश यांत लष्करी पोलीस ठेवले आहेत. या २१००० लोकांचाहि बैठ्या सैन्यांत समावेश होतो.

सैन्यावरील अधिकारी तयार करण्याकरितां **डेहराडून** येथें एक कॉलेज आहे. विलायतेंतील **सँढर्स्ट कॉलेज** हेंच काम करतें. संस्थानिकांच्या पुत्रांना शिकविण्याकरितां एक **इंपीरियल क्याडेट कोर** आहे. त्यांत सरासरी वीस राजपुत्र लष्करी शिक्षण घेत असतात. सैन्यावरील वरचे अधिकारी बहुधा यूरोपियन आहेत. हिंदी अधिकाऱ्यांचें प्रमाण फारच अल्प आहे.

हिंदुस्थानचें स्वतःचें आरमार नाहीं हिंदुस्थानच्या समुद्रकिनाऱ्याचें संरक्षण ब्रिटिश आरमाराकडून होतें. **रॉयल इंडियन मरीन** ह्मणून जीं हिंदुस्तानच्या खास मालकीचीं थोडींशीं जहाजें आहेत, त्यांचा उपयोग सैन्य व लष्करी सामान यांच्या वाहतुकीकडे होतो.

**रेलवे**—हा कारभार एका स्वतंत्र कमिटीकडून होतो. हिला **रेलवे बोर्ड** ह्मणतात. बरेचसे रेलवे रस्ते कांहीं अटींवर खाजगी कंपन्यांना

चालविण्यास दिले आहेत. परंतु लवकरच रेलवेचा कारभार या कंपन्यांकडून सरकार आपल्या हातीं घेणार आहे.

**पोस्ट व तार**—गवर्नर जनरलच्या मंत्र्याच्या हुकमतीनें हा कारभार चालतो. या खात्यांचा मुख्य अधिकारी **डायरेक्टर जनरल** ह्मणून असतो. त्याच्या हाताखालीं मोठ्या इलाख्याला एक व लहान दोन तीन प्रांत मिळून एक असे **पोस्ट मास्तर जनरल** असतात. या खात्यांचा प्रांतिक सरकाराशीं कांहींच संबंध नसतो. यांच्या हाताखालीं एकदोन जिल्हे मिळून एक पोस्ट इन्स्पेक्टर व त्यांच्यावर सुपरिंटेंडंट असे अधिकारी असतात. खेड्यांतील पोस्ट शाळामास्तर-कडे असतें. परंतु गांवांत स्वतंत्र पोस्टमास्तर असतात. येथें व्याजानें पैसे ठेवतां येतात. गरीब लोकांना आपली शिल्लक ठेवण्याकरितां ही पोस्टाची ब्यांक फारच उत्तम.

**मीठ जकाती, प्राप्तीवरील कर, अफू**—हें उत्पन्न देखील निवळ हिंदुस्थान सरकारचें आहे. यासंबंधीं दर, व कर वसूल कर-ण्याचे नियम हिंदुस्थान सरकारकडून करण्यांत येतात. प्रांतिक सर-कारचा संबंध केवळ हे कराचे पैसे वसूल करण्यापुरताच असतो. रकमेचा भरणा त्यांना हिंदुस्थान सरकारकडे करावा लागतो. या खात्यांतील प्रांतिक अधिकारी हिंदुस्थान सरकारला जबाबदार असतात.

**स्वराज्याचा थोडासा इतिहासः**—१८५८ सालापर्यंत या देशांतील राज्यकारभारावर ब्रिटिश पार्लमेंटची फक्त नजर होती. राज्य **ईस्ट इंडिया कंपनीचें** होतें. १८५८ सालीं विक्टोरिया महाराणीनें आपला प्रसिद्ध जाहिरनामा काढून राज्यकारभार कंपनीकडून आपणां-कडे घेतला. ही स्वराज्याची पहिली सनद होय.

१८६१ सालीं हिंदुस्थान सरकार आणि मुंबई व मद्रास येथें सरकारनियुक्त **सल्लागार कायदेमंडळें नेमण्यांत आलीं.** पंजाब व बंगाललाहि हा हक्क पुढें लवकरच मिळाला.

१८९२ सालीं या **कायदेमंडळांत** स्थानिक स्वराज्य संस्था, व्यापारी मंडळें व विश्वविद्यालयें यांच्या तर्फे कांहीं सभासदांच्या **निवडणुकी होऊं लागल्या व प्रश्न विचारण्याचा सभासदांना हक्क मिळाला.** प्रांतिक कायदेमंडळातर्फे वरिष्ठ कौन्सिलच्या कांहीं सभासदांची निवडणूक होऊं लागली.

१९०९ सालीं मोर्ले–मिंटो सुधारणा अमलांत आल्या. कौन्सिलांची वाढ झाली, थोडेसे चर्चेचे हक्क मिळाले, व लोकनियुक्त सभासदांचें प्रमाण वाढलें. मात्र याच वेळीं गवर्नर व व्हाइसरॉय यांच्या **कार्यकारी मंडळांत हिंदी सभासदांचा प्रथम प्रवेश झाला.**

१९१९ सालीं मांटेग्यू–चेम्सफोर्ड कायदा पास होऊन प्रचलित राज्यपद्धति अमलांत आली. **हा स्वराज्याचा पहिला हप्ता** होय.

( कोणत्या ) ? सालीं पूर्ण स्वराज्य मिळतें तें पाहूंया. कारण हिंदुस्थानला स्वराज्य द्यावयाचें ही बादशाही घोषणा आहे.

# संस्थानें.

हिंदुस्तानांत एकंदर ७०० लहान मोठीं संस्थानें आहेत व त्यांच्या अमलाखालीं सात सवासात कोटि प्रजाजन आज नांदत आहेत. या संस्थानिकांचे तीन वर्ग करतां येतात.

**पहिला वर्ग**—दक्षिण हैदराबाद ( निजाम ), म्हैसूर, बडोदें, काश्मीर व नेपाळ हीं संस्थानें या वर्गांत मोडतात. यांच्या राज्यांत ब्रिटिश सरकारतर्फे **रेसिडेंट** असतो व यांचा व्यवहार व राजकारण खुद्द **व्हाइसरायशीं** चालतें.

**दुसरा वर्ग**—या वर्गांत सरासरी १७० संस्थानें मोडतात, आणि तीं सर्व **पोलिटिकल एजंटच्या** अधिकाराखालीं स्वतंत्रपणें नांदतात. **मध्य हिंदुस्तानांतील एजन्सींत** १४८ संस्थानें सामील आहेत. त्यापैकीं ग्वालेर, इंदूर, भोपाळ, धार, रेवा हीं प्रमुख होत.

**राजपुताना एजन्सींत** जयपूर, जोधपूर, बिकानेर, उदेपूर, भरतपूर, कोटा वगैरे २० संस्थानें मोडतात.

**बलुचिस्तान एजन्सींत** खिलात व लासवेला हीं दोन संस्थानें आहेत.

पंजाब आणि मद्रास इलाख्यांतील संस्थानें, आणि काठेवाड, कच्छ व पालनपूर हीं मुंबई इलाख्यांतील संस्थानें हिंदुस्थान सरकारच्या दिमतीखालीं हल्लीं त्या त्या प्रांतिक सरकाराकडून गेलेलीं आहेत. यापुढें तीं दुसऱ्या वर्गांत मोडतील.

**तिसरा वर्ग**—यांतील संस्थानें फार लहान असून तीं निरनिराळ्या प्रांतिक सरकारच्या देखरेखीखालीं आहेत. बंगाल प्रांतांत सिकीम,

कुचबिहार वगैरे ३० संस्थानें, संयुक्त प्रांतांत रामपूर, टिहरी व काशी, मुंबई इलाख्यांत कोल्हापूर, भावनगर वगैरे ३४४ लहानलहान संस्थानें, आसामांतील मणिपूर आणि मध्यप्रांतांतील बस्तर, राजनांदगांव वगैरे लहान संस्थानें या वर्गांत मोडतात.

**संस्थानिकांचे अधिकार**—आपल्या राज्यापुरते कायदेकानू करण्याचा व आपल्या मर्जीप्रमाणें अधिकारी नेमून राज्यकारभार करण्याचा संस्थानिकांना पूर्ण हक्क आहे. अंतर्गत कारभाराविषयीं त्यांना पूर्ण स्वातंत्र्य आहे, व ब्रिटिश सरकार त्यांच्या कामकाजांत सहसा ढवळाढवळ करीत नाहीं. खालील बंधनें मात्र त्यांना पाळावीं लागतात.

१. आपल्या राज्याचे विभाग करून मुलांत तें वांटून देतां येत नाहीं.

२. वारसाचा निकाल ब्रिटिश सरकारकडून होतो. कायदेशीर वारस नसल्यास दत्तक घेण्यास ब्रिटिश सरकारची परवानगी लागते.

३. संस्थानांत धामधूम किंवा बंड झाल्यास, सती, बलिदान वगैरे धार्मिक जुलमाचे प्रकार चालू असल्यास, किंवा प्रजेवर जुलूम झाल्यास ब्रिटिश सरकारास मध्यें पडून अन्याय दूर करतां येतो.

४. संस्थानिकांस आपापसांत किंवा परराष्ट्राशीं तह किंवा राजकीय करारमदार करतां येत नाहींत. त्याचप्रमाणें ब्रिटिश सरकारच्या परवानगीशिवाय परदेशस्थ मनुष्यास आपल्या संस्थानच्या हद्दींत वसाहत करण्यास किंवा कारखाने काढण्यास परवानगी देतां येत नाहीं.

५. संस्थानिकास दुसऱ्या संस्थानिकाशीं युद्ध पुकारतां येत नाहीं.

६. आपल्या संस्थानांतील महत्त्वाच्या घडामोडींची किंवा चळवळींची माहिती रेसिडेंट किंवा पोलिटिकल एजंट यांस दिली पहिजे.

**ब्रिटिश सरकारचें कर्तव्य**—संस्थानिकांचें अंतस्थ वंडाळी किंवा परकीय स्वाऱ्या यांच्यापासून संरक्षण करण्याची जबाबदारी ब्रिटिश सरकारनें पत्करली आहे.

**राजेरजवाड्यांची सभा**—ही सभा दर वर्षीं एकदा दिल्ली येथें भरते, आणि या नरेंद्रमंडळाचें मत हिंदुस्थानच्या कारभाराविषयीं विचारलें जातें. त्याचप्रमाणें सर्व हिंदुस्थानविषयक प्रश्नांची चर्चा करण्याचा, किंवा संस्थानिकांचे सर्वसामान्य प्रश्न हिंदुस्थान सरकारास सुचविण्याचा या मंडळास अधिकार दिलेला आहे. हिंदुस्थानचा सरासरी एक तृतीयांश भाग संस्थानिकांच्या ताब्यांत असल्यामुळें साम्राज्यविषयक प्रश्नांवर त्यांचें मत घेणें जरूर आहे. सर्वराष्ट्रीय परिषदेला एखादा संस्थानिक प्रतिनिधि पाठविण्याचा प्रघातहि अलीकडे पडला आहे.

## ७

# सेक्रेटरी ऑफ स्टेट.

हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग आहे. हें ब्रिटिश साम्राज्य एवढें मोठें आहे, कीं, त्याच्यावर सूर्य कधींच मावळत नाहीं. जगाचा एकपंचमांश भाग व जगांतील एकचतुर्थांशापेक्षां अधिक लोकसंख्या ब्रिटिश साम्राज्यांत समाविष्ट झालेली आहे. दक्षिण आफ्रिका, कानडा, आस्ट्रेलिया, न्यू झीलंड या संपूर्ण स्वराज्य भोगणाऱ्या वसाहती, सीलोन व ट्रीनीदाद या खास बादशाही अंमलाखालीं असणाऱ्या वसाहती, व स्वराज्याच्या ध्येयाला पोंचूं पाहणारा हिंदुस्तान, हे सर्व या प्रचंड साम्राज्यांत मोडतात. ब्रिटिश साम्राज्याचे अधिपति लंडन येथें राहतात. लंडन हें सर्व साम्राज्याचें केंद्र आहे. त्यामुळें ब्रिटिश साम्राज्यांतील प्रत्येक भागातर्फे एखादा तरी मंत्री लंडन येथें राहतो.

ब्रिटिश पार्लमेंटाला हिंदुस्थानाकरितां जबाबदार असणाऱ्या मंत्र्याला **सेक्रेटरी ऑफ् स्टेट** असें ह्मणतात. सेक्रेटरी ऑफ स्टेटला दोन मदतनीस असतात. त्यांना **अंडर सेक्रेटरी** म्हणतात. एक पार्लमेंटांत काम करतो, व दुसरा कचेरीचें काम पाहतो. यांचे पगार विलायत सरकारच्या खजिन्यांतून हल्लीं दिले जातात. वरिष्ठ सनदी जागांच्या नेमणूकी सेक्रेटरी ऑफ् स्टेटच्या हातीं असतात. त्याला एक **इंडिया कौन्सिल** ह्मणून आठ ते बारा सभासदांचें सल्लागार मंडळ असतें. यापैकीं **निदान दोन हिंदी इसम असतात**. हिंदी खजिन्यांतून कांहीं खर्च करावयाचा असल्यास, सनदी नोकरांचीं पगार-पेन्शनें, व हिंदी लोकांच्याकरितां वरिष्ठ जागा राखून ठेवणें, या बाबतींत सेक्रेटरी ऑफ् स्टेटला या मंडळाची संमति घ्यावी लागते. बाकी तो स्वतंत्र असतो व आपल्या अधिकारांत हिंदुस्थान सरकारला हुकूम सोडतो.

एखाद्या बाबतींत कौन्सिलचा सल्ला घेणें न घेणें सर्वस्वी त्याच्या मर्जी-वर आहे. सल्ला घेतला तरी त्याप्रमाणें वागलेंच पाहिजे असें बंधन त्याच्यावर नाहीं. गव्हर्नर, हायकोर्टाचे न्यायाधीश वगैरे नेमणुका करण्याविषयीं तोच बादशहाकडे शिफारस करतो. प्रत्येक महत्त्वाच्या गोष्टींत हिंदुस्थान सरकारला स्टेट सेक्रेटरीचा सल्ला घ्यावा लागतो. कारण हिंदुस्थान सरकार हल्लीं हिंदुस्थानांतील वरिष्ठ कायदेमंडळांना जबाबदार नसून स्टेट सेक्रेटरीच्या मार्फत ब्रिटिश पार्लमेंटला जबाबदार आहे. ब्रिटिश पार्लमेंट हें ग्रेटब्रिटनच्या लोकांनीं निवडून दिलेलें असतें. त्यामुळें हिंदुस्थानच्या राजकारभाराची सुधारणा सर्वस्वी विलायतेंतील लोकमतावर अवलंबून आहे. स्वराज्य उपभोगणाऱ्या वसाहतींची गोष्ट तशी नाहीं. दक्षिण आफ्रिका, किंवा कानडा येथील गव्हर्नर आपापल्या पार्लमेंटच्या ( त्या त्या देशाचें वरिष्ठ कायदेमंडळ ) तंत्रानें चालतात, कारण ते त्यांनां जबाबदार असतात. स्टेट सेक्रे-टरीप्रमाणें या वसाहतींचा ह्मणून एक **कलोनियल सेक्रेटरी** ब्रिटिश प्रधानमंडळांत मंत्री असतो. परंतु तो वसाहतींना हुकूम सोडूं शकत नाहीं, किंवा त्यांच्या कारभारांत हात घालूं शकत नाहीं. तो वसा-हतीच्या कारभाराची माहिती ठेवतो, आणि अखिल साम्राज्यविषयक गोष्टींतच त्यांनां सल्ला देतो.

याशिवाय विलायतेंत हिंदुस्तानला लागणारा माल खरेदी करण्या-करितां, रेल्वे वगैरेचे ठेके देण्याकरितां, हुंडणावळीचा भाव निश्चित करण्याकरितां किंवा इतर व्यापारविषयक प्रश्न हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें सोडविण्याकरितां एक हिंदी अधिकारी असतो. त्याला हिंदुस्था-नचा **हाय कमिशनर** असें ह्मणतात.

याशिवाय ब्रिटिश पार्लमेंटच्या **कॉमन्स** व **लॉर्डस्** या दोन्ही सभागृहांच्या सभासदांतून नेमलेली एक **मिश्र सल्लागार कमिटी**

असते. वरिष्ठ कायदेमंडळाच्या अनुमतीशिवाय आपल्या जबाबदारीवर गव्हर्नर जनरलनें पास केलेले कायदे या कमिटीनें व स्टेट सेक्रेटरीनें पसंत केले तरच त्यावर बादशाही शिक्कामोर्तब होतें.

हिंदुस्थान देशावर इंग्लंडची सत्ता आहे. हिंदुस्थान हा बादशाही मुलुख समजला जातो. परंतु विलायतेंत बादशहाला स्वतंत्र अशी सत्ता नाहीं. पार्लमेंटच सर्व राज्यकारभार पाहतें. यामुळें हिंदुस्थानला स्वराज्याचे अधिकार देण्याकरितां पार्लमेंटनें कायदा करणें जरूर आहे. पार्लमेंटनें १९१९ सालीं जो मॉंटेग्यू–चेम्सफोर्ड कायदा पास केला त्यामुळें ही राज्यव्यवस्था अमलांत आली आहे. या राज्यपद्धतीचें यंत्र खालीं दिलें आहे.

बादशहा—विलायतचें पार्लमेंट.

विलायतचें मंत्रीमंडळ ( कॅबिनेट ).

स्टेट सेक्रेटरी—इंडिया कौन्सिल.

गव्हर्नरजनरल ( व्हाइसरॉय )—कार्यकारी मंडळ.
( लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व कौन्सिल ऑफ स्टेट यांच्या सल्ल्यानें ).

लहान प्रांतांचे चीफ कमिशनर.

रेसिडेंट किंवा पोलिटिकल एजंट मार्फत ( संस्थानें ).

मोठ्या प्रांतांचे गव्हर्नर. प्रांतिक कायदेकौन्सिल.

कार्यकारी सभासद. (राखीव खातीं)

दिवाण. (सोंपीव खातीं)

## परिशिष्ट १.

| प्रांत | जिल्हे | क्षेत्रफळ ( चौरस मैल ) | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| अजमीर-मारवाड | २ | २,७११ | ४,९५,८९९ |
| बलुचिस्तान | ६ | ४५,८०४ | ४,२१,६७९ |
| सरहद्दीवरील प्रांत | ५ | १६.४६६ | २२,४७,६९६ |
| दिल्ली | शहरच्या | हद्दीपुरता प्रांत | ४,८६,७४१ |
| कूर्ग | १ | १,५८२ | १,८४,४५९ |
| आंदमान-निकोबार | २ | ३,१४३ | २६,८३३ |
| बंगाल | २८ | ७८,४१२ | ४,६६,५३,१७७ |
| मुंबई ( सिंध व एडनसुद्धां ) | २६ | १,२३,०६४ | १,९३,३८,५८६ |
| मद्रास | २४ | १,४१,७२६ | ४,२३,२२,२७० |
| संयुक्त प्रांत | ४८ | १,०७,१६४ | ४,५५,९३,९४६ |
| पंजाब | २९ | ९७,२०९ | २,०६,७८,३९३ |
| बिहार-ओरिसा | २१ | ८३,२०५ | ३,३९,९८,७७८ |
| ब्रह्मदेश | ४१ | २,३६,७३८ | १,३२,०५,५६४ |
| आसाम | १२ | ५२,९५९ | ७५,९८,८६१ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | २२ | १,००,३४५ | १,३९,०८,५१४ |
| एकंदर १५ | २६७ | १०,९०,५२८ | २४,७१,६१,३९६ |

## परिशिष्ट २.

| | | | |
|---|---|---|---|
| ब्रिटिश हिंदुस्तानांतील लोकसंख्या ( ठोकळ मान ) | २४ कोटि | ७० | लक्ष |
| सुशिक्षित लोक | १ ,, | ८६ | ,, |
| कायदे मंडळांचे मतदार | फक्त | ५४ | ,, |

---

## परिशिष्ट ३.

| | | |
|---|---|---|
| संस्थानें धरून हिंदुस्तानची लोकसंख्या | ३१ | कोटि |
| त्यापैकीं हिंदु | २१ | ,, |
| मुसलमान | ७ | ,, |
| अन्य धर्मीय | ३ | ,, |

---

## परिशिष्ट ४.

जातवार विशिष्ट मतदार संघ.

| | | |
|---|---|---|
| १ | मुसलमान | सर्व प्रांतांत. |
| २ | मराठे | मुंबई इलाखा. |
| ३ | शीख | पंजाब. |
| ४ | यूरोपियन | मुंबई, बंगाल, मद्रास, संयुक्त प्रांत, आसाम व ब्रह्मदेश. |

याप्रमाणें कांहीं थोड्याशा निवडणुकी जातवार तत्त्वावर होतात, बाकीच्या निवडणुकी सर्वसाधारण मतदारांतून होतात. मुसलमानांनीं मात्र सर्वत्र सवता सुभा स्थापन केला आहे.

---

## परिशिष्ट ५.

# मोठ्या अधिकाऱ्यांचे सालिना पगार

| | |
|---|---|
| सेक्रेटरी ऑफ स्टेट | ५००० पौंड |
| अंडर सेक्रेटरी २ | २००० व १५०० पौंड अनुक्रमें |
| इंडिया कौन्सिलचे हिंदी सभासद | १८०० पौंड प्रत्येकीं |
| ,, यूरोपियन ,, | १५०० ,, ,, |

---

| | | |
|---|---|---|
| व्हाइसरॉय | | २,५६,००० रुपये |
| सर सेनापति | | १,००,००० ,, |
| व्हाइसरॉयच्या कौन्सिलचे कार्यकारी सभासद | | ८०००० प्रत्येकीं |
| बंगाल, मुंबई, मद्रास व संयुक्त प्रांतांचे गव्हर्नर | | १,२८००० ,, |
| पंजाब व बहार–ओरिसा | ,, | १००००० ,, |
| मध्यप्रांत–वऱ्हाड | ,, | ७२००० |
| आसाम | ,, | ६६००० |
| बंगाल, मुंबई, मद्रास व संयुक्त प्रांत येथील कार्यकारी सभासद | | ६४००० प्रत्येकीं |
| पंजाब व बिहार–ओरिसा | ,, | ६०००० ,, |
| मध्यप्रांत | ,, | ४८००० ,, |
| आसाम | ,, | ४२००० ,, |

दिवाणांनां कार्यकारी सभासदाइतका पगार कायद्यानें मिळूं शकतो, त्यांनां कमी द्यावयाचा असल्यास गोष्ट निराळी.

## परिशिष्ट ६.

## निरनिराळ्या प्रांतांचा सरासरी जमाखर्च.

| | |
|---|---|
| मुंबई इलाखा | १५ कोटि रुपये. |
| बंगाल | ११ ,, |
| मद्रास | १७ ,, |
| संयुक्त प्रांत | १५॥ ,, |
| पंजाब | १२॥ ,, |
| ब्रह्मदेश | १६ ,, |
| बिहार–ओरिसा | ५॥ ,, |
| आसाम | २॥ ,, |
| मध्यप्रांत–वऱ्हाड. | ६॥ ,, |

---

## परिशिष्ट ७.

हिंदुस्तानला संपूर्ण स्वराज्य देण्याचें ठरलें, परंतु कालमर्यादा ठरली नाहीं. तरी त्या मार्गांतील अडचणी समजावून घेण्याकरितां देशांत हल्लीं असलेल्या राजकीय पक्षांची माहिती करून घेण्याची जरूरी आहे. कारण कायदेमंडळांत या निरनिराळ्या पक्षांचे प्रतिनिधि असतात. शिवाय एकंदर राजकारणांत व त्याविषयींच्या चर्चेंत त्या त्या पक्षांचीं मतें नेहमीं ऐकूं येतात.

१. **कॉँग्रेसमधील असहयोगी पक्ष**––सरकारी राज्यकारभारापासून शक्य तितकें फटकून राहून केवळ स्वावलंबनानें स्वराज्य गांठावयाचें धोरण या पक्षानें आंखलें आहे.

२. **कॉँग्रेसमधील स्वराज्य पक्ष**––सरकार परकीय असल्यामुळें तें आपणांस स्वराज्य आपण होऊन कधींच देणार नाहीं, असें

या पक्षास वाटतें, ह्मणून सरकाराला शक्य तो अडथळा व क्वचित् प्रसंगींच सरकारशीं सहकारिता असें या पक्षाचें धोरण आहे.

३. **नेमस्त पक्ष**— ब्रिटिश पार्लमेंटच्या न्यायीपणावर या पक्षाचा विश्वास आहे. त्यामुळें हिंदुस्थानास स्वराज्य देण्याचें वचन सरकार पाळील असें या पक्षास वाटतें. सरकाराशीं शक्य तों सहकार्य करून देशाचें पाऊल पुढें नेण्याचें धोरण यांना मान्य आहे.

४. **ब्राह्मणेतर पक्ष**—हिंदुस्थानास स्वराज्य मिळालें तर ब्राह्मणादि पुढारलेल्या जाति सर्व अधिकार बळकावतील व मागसलेल्या ब्राह्मणेतर जातींवर जुलूम करतील, सबब त्या जाति सुधारल्याशिवाय हिंदुस्थानाला स्वराज्य देण्यांत येऊं नये या मताचा पक्ष. ( सर्व ब्राह्मणेतरांचा या पक्षांत अर्थात्च समावेश होत नाहीं. कारण ब्राह्मणेतरांपैकीं बरेच लोक पहिल्या तिहींपैकीं कोणत्या तरी एका पक्षांत मोडतात. )

५. **अस्पृश्यलोक पक्ष**—या सात कोटि लोकांस ब्राह्मण व ब्राह्मणेतर उच्च जाति यांनीं आजपर्यंत दडपलें असल्यामुळें परकीय सरकारचें राज्यच यांना बरें वाटतें. हा पक्ष अत्यंत मागसलेला असल्यामुळें याला अजून जोराची वाचा फुटली नाहीं.

६. **यूरोपियन पक्ष**—या देशांत असलेले यूरोपियन व्यापारी, चहाचे मळेवाले व ज्यांचे आर्थिक संबंध या देशांत गुंतले आहेत, असे परकीय लोक. त्यांनां अर्थात्च स्वकीयांचें राज्य या देशांत नेहमींकरितां चालावें असें साहजिक वाटतें. त्यामुळें हिंदुस्थानाला स्वराज्य देण्याविरुद्ध हे निकराची चळवळ करतात.

मुसलमानांचा पूर्वी स्वतंत्र राजकीय पक्ष होता. परंतु लखनौ कांग्रेसमध्यें हिंदु-मुसलमानांचा तह झाल्यापासून मुसलमान लोक पहिल्या तीन पक्षांत सामील झाले आहेत.

या मतमतांतराच्या गलबल्यांत हिंदुस्थानला पूर्ण स्वराज्य केव्हां मिळेल हें सांगणें कठीण आहे.

---

## परिशिष्ट ८

## हिंदुस्तानांतील सरकारी नोकर.

सरकारी नोकरांचे खालील वर्ग करतां येतील.

१. **बादशाही नेमणूकीचे:**—व्हाइसराय, गवर्नर, व त्यांचे कार्यकारी सभासद आणि वरिष्ठ कोर्टाचे न्यायाधीश यांच्या नेमणूका बादशाही हुकमानें होतात. व्हाइसरॉय थेट विलायतेहून येतो. इतर अधिकाऱ्यापैकीं कांहीं थेट विलायतेहून नवीनच या वरच्या जागांवर एकदम नेमले जातात व कांहीं येथें बरेच दिवस नोकरी केलेल्या सनदी नोकरांतून नेमले जातात. आजपर्यंत फक्त **एकच गवर्नर** ( लॉर्ड सिंह ) हिंदी लोकांपैकीं नेमण्यांत आला. इतर जागांवर हिंदी लोकांचें प्रमाण शेकडा तेहतीस पडतें. बाकीचे युरोपीयन असतात.

२. **सनदी नोकर:**—यांची नेमणूक सेक्रेटरी ऑफ स्टेटकडून होते. यांची निवडणूक चढाओढीच्या परीक्षांनीं होते. आजकाल या परीक्षा विलायतेप्रमाणें हिंदुस्थानांतही होतात. यांची व्यवस्था स्टेट सेक्रेटरीच्या हातीं असते. यांनां **इंपीरियल सर्विसीज** असें ह्मणतात. प्रत्येक खात्यांतील वरिष्ठ जागा याच नोकरांना मिळतात. पूर्वी या जागांवर बहुतेक युरोपीयनच असत, परंतु हल्लीं शेकडा २५ हिंदी

गृहस्थ आहेत, व हिंदी लोकांची संख्या शेकडा ५० करण्याचें अभिवचन मिळालें आहे. परंतु ही गोष्ट घडून येण्यास कांहीं वर्षें लागतील. या नोकरांचे पगार पांचशें रुपये महिन्यापासून तों तीन हजार रुपये महिन्यांपर्यंत असतात. या सनदी नोकऱ्यांत ( आय. सी. एस. ) **इंडियन सिविल सर्विस** ही महत्त्वाची होय. जिल्हे साहेब, डिस्ट्रिक्ट जज, कमिशनर, हायकोर्ट जज्ज, कार्यकारी सभासद व प्रसंगविशेषीं गवर्नर या जागांवर यांच्यांतूनच नेमणूका होतात. डाक्टरी, एंजिनीयरी, शाळा, जंगल, पोलीस, शेती, वगैरे खात्यांतील सनदी नोकर फार तर आपल्या प्रांतांतील खात्यांचे मुख्य होऊं शकतात. यांचा सर्वसाधारण पगार पांचशें रुपये महिन्यापासून तों पंधराशें रुपयांपर्यंत असतो. याच्यावर फारच थोडे चढूं शकतात.

**३. प्रांतिक नोकर—प्राव्हिन्शियल सर्विसीज**. या नेमणूका प्रांतिक सरकारकडून होतात. यांच्यावर बहुतेक सर्व हिंदी लोकच आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हे मुख्य मदतनीस असतात. छोटे साहेब, सबजज, प्रोफेसर, असिस्टंट इन्स्पेक्टर, असिस्टंट सर्जन, जंगल, अबकारी वगैरे खात्यांतील दुय्यम अधिकारी हे सर्व या वर्गांत मोडतात. यांचा पगार सरासरी २५० पासून ८५० रु. महिन्यापर्यंत असतो. याच्यावर फारच थोडे लोक चढतात.

**४. सबॉर्डिनेट सर्विसेज**—यांच्यांत वरचा व खालचा ( अपर व लोअर ) असे दोन वर्ग आहेतच. शाळामास्तर, कारकून, लहान दवाखान्याचे डाक्टर, ओवर्सीयर, ऑडिटर, इन्स्पेक्टर, सबइन्स्पेक्टर, वगैरे सर्व नोकर या वर्गांत मोडतात. या सर्वस्वी हिंदी लोकांनीं भरल्या

आहेत. खालच्या वर्गांतील पगार ३० रु. ते १०० रुपयेपर्यंत व वरच्या वर्गांतील पगार सरासरीनें १०० ते ३०० रुपयेपर्यंत असतो.

**मिनीयल सर्वीस**——चपराशी, पट्टेवाले, दफ्तरी यांचा समावेश होतो. यांचा पगार १५ रुपये ते ३० पर्यंत असतो.

3000

**टीप**—सोपीव खात्यांतील सनदी नोकरांचें प्रमाण कमी होऊन त्यांचा अंतर्भाव हळूहळू प्रांतिक नोकरांत होत आहे. पुढें मागें लवकरच सोपीव खात्यांतील सर्व नोकऱ्या प्रांतिक होतील. राखीव खात्यांची गोष्ट मात्र वेगळी. सिविल सर्वीस व पोलीस यांतील सनदी युरोपीयन नोकरांची संख्या लवकर कमी होण्याचा फारसा संभव नाहीं. कारण त्यांच्या आधारावर राज्याचा कारभार सुरळित चालला आहे, अशी पार्लमेंटची समजूत आहे.

वरचे लष्करी अधिकारी शेंकडा ९५ युरोपीयन आहेत. हिंदी लोकांचा प्रवेश या जागांवर फारच हळू होत आहे. लेफ्टनेंट, क्याप्टन, मेजर, कर्नल या सर्व लष्करी अधिकाऱ्यांना **कमिशन्ड आफिसर्स** ह्मणतात, व बादशाहांकडून यांच्या नेमणूका होतात. दुय्यम दर्जाच्या सुभेदार, जमादार वगैरे अधिकाऱ्यांच्या जागा मात्र हिंदी लोकांनीं व्यापल्या आहेत.